म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १०५१
IRBK-0101051
IRBK-0101051
IRBK-0101051

# माझी आई!

( शोकपर्यवसायी सामाजिक नाटक. )

मु. वं. ठाणे. वाचनालय शाखा.
अ. क्र. ४०५७
वा. क्र.
प्र.
वि.

—: लेखक :—

... देवभानकर, बी. ए.

( सर्व हक्क स्वाधीन. )

IRBK-0101051

IRBK-0101051

—: मुद्रक :—

ना० मा० नेमाडे.

मालकः—श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेस, जळगांव.

किंमत दहा आणे.

# दोन शब्द.

नाटकांचा जन्म रंगभूमीवर नांदण्याकरितां होत असला तरी कलेचें तेज अंगीं असल्याशिवाय त्यांचें जीवन सार्थकी लागणार नाहीं. रंगभूमीवर नांव मिळवून कलावैशिष्ट्यानें मोल पावलेल्या कृति प्रसंगीं अल्प असल्या तरी नाट्यवाङ्मयांत खरी भर त्यांच्यानेंच पडूं शकते. असे ग्रंथ नाट्यशास्त्राच्या मार्मिक अभ्यासकांना कांहीं नवीन दृष्टिकोन देऊन त्यांच्या कलाभिरुचीस वळण लावतात व मागेंपुढें त्यांच्याकडून नाट्यसृष्टीची शोभा वाढविण्यास कारणीभूत होतात.

वरील दर्जाचीं नाटकें लिहिण्याचें सर्वांनाच साधणार नाहीं. शिवाय ज्या कोणाचें एखादें दुसरें नाटक तसें उतरेल अशा अनुभविक लेखकासहि त्याच्या सर्व नाटकांतून आपला हेतू सारखाच सफल झालेला आढळेल असेंही नाहीं. इतकें असून त्या दिशेनें प्रयत्न करून पाहण्याचा मोह कोणाहि कलोपासकास टाळतां येणार नाहीं हें मात्र खरें! प्रस्तुत नाटक देखील अशाच कलात्मक आकांक्षास वश होऊन लेखकाकडून लिहिलें गेलें असल्यामुळें त्यांत रंगभूमीच्या हेतूपेक्षां कला दृष्टीलाच अधिक प्राधान्य मिळणें साहजीक आहे. तथापि ह्या प्रयत्नांत यशापयशाचा त्याला स्वतांला अजमास लागण्यापेक्षां समतोल व मार्मिक नाट्यटीकाकारासच योग्य परीक्षणा अंतीं त्याचा निकाल देणें सुलभ होईल.

नाटकाचा प्रसंगच अगदीं साधा असल्यामुळें संविधान-कांहि साधेंच आहे. पण कित्येक साधे प्रसंगच पुष्कळ वेळां हृदयस्पर्शी असतात. निरनिराळ्या व्यक्तींच्या मनोरचनेंतील व निरीक्षण शक्तींतील फरक लक्षांत घेतला असतां जो प्रसंग एखाद्याचें हृदय हालवील तो दुसऱ्याचेंहि हृदय हालवीलच असें सांगतां येणार नाहीं. ह्या विषमतेचें निर्मूलन बऱ्याच अंशीं भावना जागृतीच्या साम्यावर अवलंबून राहील. तरीहि लेखकास वाटतें कीं, या नाटकाद्वारें स्पष्ट केलें गेलेलें दृश्य स्वाभाविकपणें सर्वांना सारखेंच खेदजनक वाटेल.

या संसार चित्रांतील दोन स्थलांचा निर्देश या ठिकाणीं करावासा वाटतो. एक दत्तविधान व दुसरें केळें खाऊन दोन्ही मुलांचा एकदम झालेला मृत्यू वरवर पाहिलें असतां हे प्रसंग मुद्दाम घातल्यासारखे वाटतील. पण समुद्राप्रमाणें संसार सागरांत सुखाच्या भरतीच्या जागीं लगेच दुःखाची ओहोटी व दुःखाच्या ओहोटीच्या ठिकाणीं दुसऱ्याच क्षणीं सुखाची भरती वारंवार येत असल्यामुळें दुःखसाम्राज्यांतून देखील कधीं कधीं दत्त-विधानासारखें सुखाचे प्रसंग आकस्मिकपणें चमकून जातात व दीर्घ काळानें परिणाम करणाऱ्या विषयुक्त केळ्यांच्या अजाणपणें केलेल्या सेवनानें सुखसमाधानांत चाललेल्या काळांत कधीं कधीं दोन्ही मुलांच्या मृत्यू सारखे दुःख प्रसंग अकल्पितपणें डोकें वर काढतात. हा दुःखाचा डोंगर तर एखादेवेळीं एवढा प्रचंड असतो कीं तो संसारसागरांत तरंगणाऱ्या एखाद्या लहानशा होडीला सहज कायमची जल समाधि देऊन

टाकतो. सावित्रीबाईच्या संसाराचें शेवटीं जें काय झालें तें हेंच. ह्या स्थलांच्या योजनेंत कृत्रिमता नसून जगाच्या अनुभवांतलें तें एक सत्य दिग्दर्शन मात्र आहे. त्यावरूनच माझ्याप्रमाणें वाचकापुढेंहि असा एक कूट प्रश्न उत्पन्न होईल कीं, सावित्रीबाईचें हें असें कां झालें? समाजांत कांहीं कांहीं जीवांचे हे असे हाल कां? ह्याच्या कारणांच्या थांग दैवाच्या तळघरांत लागावयाचा नसून समाजाच्या अंधारकोठडींतच लागेल असा लेखकाचा विश्वास आहे. व तो अस्थानीं नाहीं एवढें वाचकांच्या पुढें ही कृति ठेवून त्याला अजमावितां येईल.

या विवेचनांत लेखकास स्वताचें मुळीच समर्थन करावयाचें नसून मन मोकळेपणानें वाचकापुढें त्याला हृदय उघडें करून दाखवावाचें आहे इतकेंच काय तें! 'निर्दोष कांहीं जगतांत नाहीं' या कव्युक्ती प्रमाणें ही कृति देखील निर्दोष नसेल याची नम्र जाणीव त्यास आहे. मागेंपुढें दोष त्याच्या लक्षांत आणून दिले गेल्यास सुधारणेच्या दृष्टीनें ते त्याला खरोखर उपकारकच होतील.

नाट्य परिभाषेकडे ( Dramatic Technic ) शक्य तितकें लक्ष पुरविलें असून क्रिया, स्थल, काल, यांचें ऐक्य राखण्याचा प्रयत्न केला आहे. एकंदर काल मर्यादा मात्र अल्प आहे. सहज स्वभावपरिपोष व आटोपशीर नाट्यरचना यांचें साहचर्य जुळून आलें आहे. या गंभीर कथानकांतून विनोद अगदीं गाळला असून एकरूप नायक नायिकांच्या विरुद्ध खल

पुरुष अशा ठरीव साच्याचें कथानकांतील बंधन देखी
मुद्दाम पाळिलें नाहीं. एकंदरीत कोणाच्याहि पावलावर प
न ठेवितां स्वतंत्रपणें पाऊल वाट काढण्याचा प्रयत्न केला अ

शेवटीं माझे स्नेही काव्यकिरण मालेचे संपादक श्री. प्र
का. भोरटके यांनीं अमोल सूचना देऊन मला फार ऋणी करू
ठेविलें आहे. त्यांचे मी आभार मानतों. तसेंच श्रीकृष्ण प्रिंटिं
प्रेसचे मालक श्री. नेमाडे यांनीं मला बऱ्याच सवलती देऊ
पुस्तक वेळेवर छापून दिलें याबद्दल त्यांचाही मी फार आभार
आहे.

जळगांव,
ता. १ मे सन १९३१

देवभानकर.

|| श्रीशंकर. ||

# "माझी आई"

## अंक पहिला.

नाट्य ६६७

### प्रवेश पहिला.

[ स्थळः —मध्यम स्थितींतल्या कुटुंबाला जितका सजवितां येईल तितका सजविलेला एक सखारामपंतांच्या घरांतील दिवाणखाना. कोपऱ्यांत भिंतीशीं टेबल खुर्ची मांडली आहे व त्या जवळ बाळः— सुमारें अकराबारा वर्षांचा, चेहरा सौम्य परंतु पाणीदार, सडपातळ बांध्याचा, मोठा कोट व विजार घालून उभा आहे. अण्णाः— सुमारें सात आठ वर्षें वयाचा किंचित् अजागळ, थोडा लाडावलेला, बाळा जवळच उभा आहे. पडदा वर गेल्यावर सावित्रीबाईः— सुमारें २०।२५ वर्षें वयाची, सकेशाविधवा, रूपवान परंतु कळांनें टवटवी नसलेली हातांत पोथी घेऊन प्रवेश करते. ]

**सावित्रीबाईः**—[ हंसत मोठ्यानें पण शांतपणानें ] हळू- हळू, जरा. काय हा धिंगाणा ? बाई ! बाई ! त्या काकीचा कांहीं धाक आहे कां नाहीं ? तरी त्या नेहमीं बडबडत असतात ना ? बाळ ! अण्णा ! अगदीं गप्प बसा, त्या रागावतील बरं !

**आण्णाः**—रागावूंदे ग, त्या नेहमींच रागावतात. त्यांचा मार खाऊन खाऊन आह्मी अगदीं कोडगे झालों आहोंत. काका नाहीं रागावले ह्मणजे झालं.

**सावित्रीबाईः**—पण तुम्ही हें आज मांडलं तरी काय ? मला अजून पोथी वाचायची आहे. अशानें उशीर नाहीं कां होणार ? आपण वाचायला बसावं आणि तिकडून भाउजींनीं यावं, म्हणजे आजच्या पोथीला तुमच्यामुळें खो मिळायचा ! आजच्या दासबोधांतला सर्ग फार छान आहे बरं कां ? अण्णा ! [ हाक मारते ] तो पाट आण बरं, इथं मांड, आणि पुरे झालं आतां खेळणं. या, थोडं ऐका. [ पाट मांडते त्यावर बसते. एक पाट पुढं ठेविते व पोथी उघडते, नंतर बाळाकडे पाहून ] अरे बाळ, अरे हें काय ? भाउजींचा कोट काय घातला आहेस आणि त्यांच्या टेबलाशीं काय उभा आहेस ? आहे तरी काय खेळ हा ?

**बाळः**—आई मी इथला सरदार झालों आहें. मी आतां व्याख्यान देणार आहें. आणि व्याख्यान झाल्यावर माझी सर्व गांवांतून मिरवणूक निघणार आहे.

**सावित्रीबाईः**—[ आश्चर्यानें ] असं काय ? परवाची मिरवणूक पाहिली वाटतं सरदारांची ? म्हणून तर असले खेळ सुचत आहेत ! बरं, मोठे सरदार होणार आहांत ठाऊक आहे ! या इकडे पोथी ऐकायला. [ थोडा विचार करून हंसत ] कायरे पण बाळ, तूं सरदार झालास तर मी तुमची आई तरी शोभेल कां ? कोणी विचारलं कीं ही कोण आहे तुमच्या घरांत, तर माझी आई आहे म्हणून सांगशील कां आहे कोणी स्वयंपाकीण म्हणून म्हणशील ? काय हो सरदार ? अन् तूं रे अण्णा, तूं कोण होणार ?

**आण्णाः**—मी कां ? मी डॉक्टर होणार आहे.

**सावित्रीबाई**:—असं कां? ह्मणजे कोणी आजारी पडलं तर डॉक्टरचे पाय धरावयास नको, घरचा डॉक्टर! चांगला खेळ आहे बरं कां, पण पुरे आतां खेळणं, काकी रागावल्या आहेत, ठाऊक आहे ना? आज तीन दिवस झाले माझ्याशीं भाषण बंद केलं आहे. आजपर्यंत इतक्या कधींच रागावल्या नव्हत्या त्या. ध्यानांत ठेवा. सगळा राग निघेल नाहींतर तुमच्यावर बरं कां? [ बाळ, अण्णा हंसतात ] हंसतां काय? हंसूं नका, फार हंसलं ह्मणजे देव रडायला लावतो बरं.

**बाळ**:—पण माझं येवढं व्याख्यान तर ऐकून घे. [ पुस्तक उघडतो ].

**सावित्रीबाई**:—पुस्तकांतलंच वाचून दाखविणार ना? मग काय तुझं शहाणपण!

**बाळ**:—ऐक तर खरं, [ घसा खाकरून, वक्त्याप्रमाणें गंभीरपणानें ] अरे, आह्मी बायका परस्वाधीन. आमचं जिणं दुसऱ्यावर अवलंबून—

**सावित्रीबाई**:—हें काय भलतेंच वाचून दाखवितोस? तूं बायको कां आहेस? मग त्यांची कड घेऊन कशाला तेंच वाचून दाखवितोस?

**बाळ**:—हूं ऐक तर खरं, "अरे, आम्ही बायका परस्वाधीन. आमचं जिणं दुसऱ्यावर अवलंबून. जगांत कुठं कुठंही जा—थोड्या फार प्रमाणांत कां म्हणाना— आमचा बायकांचा जन्म म्हणजे परस्वाधीनच. त्यांतून हक्काचं माणूस गेलं म्हणजे मग तर दुःखाला पारावारच नाहीं. कोणी ढुंकून पहायला तयार नसतं. जग सुखाचं आहे. दुसऱ्याच्या दुःखाकडे पहायला आज लोकांना फुरसत नाहीं. आमची उपासमार झाली, आम्हाला वाटेल तीं बोलणीं सहन करावीं लागलीं, क्वचित् प्रसंगीं आमची अब्रू देखिल धोक्यांत असली, तरी आम्हाला

निमुटपणानें सहन करावं लागतं; बोलून दाखविणार कोणाजवळ? आणि आमची कड तरी कोण घेणार! [ थांबते ] पै पै करितां दुसऱ्याच्या तोंडाकडे पहावं, संरक्षणाकरितां कोणाला तरी चिकटून रहावं, काम करितां करितां रक्ताचं पाणी करावं, तरी पण कोणी आम्हांला चांगलं म्हणूं नये. [ थांबते ] आमचं नशीबच फुटकं म्हणून आम्ही बायका झालों. मागच्या जन्मींचं देणं राहिलं ते या जन्मीं त्यांची ताबेदारी करून फेडीत आहोंत. अरे, आम्ही कांहीं झालं तरी परस्वाधीन त्या परस्वाधीन. आमचं जिणं दुसऱ्याच्या सुखा करितां:—

सावित्रीबाई:—[ कंटाळून ] हं पुरें. काय करायचं आहे असं अभद्र वाचून? कांहीं तरी असं अभद्र वाचून सुखाचा दिवस उगाच दुःखांत घालावा! कांहीं तरी अभद्र वाचायचं ह्मणजे काय? हो, कांहीं देवधर्माचं, कांहीं आनंद होईल असं वाचलं तर फायदा? चला. या. यापेक्षां देवाचं नांव घेतलेलं काय वाईट? ज्या रस्त्यानें जायचं नाहीं, त्याची वाट कां विचारावी? बाळ, ये बरं असा, देवाचं नांव घेण्यांत अशी टंगळमंगळ करूं नये. अशानें देव शिक्षा करतो बरं! पोथी लवकर आटोपली पाहिजे. काका येण्याची वेळ झाली. [बाळ, अण्णा जवळ येऊन बसतात, सावित्रीबाई पोथी उघडून वाचते].

"वनावरी वनचराची सत्ता। जळावरी जळचराची सत्ता।
भूमंडलीं भूपाळा समस्ता। येणेंचि न्यायें

बाळ, सर्व सत्ताधीश तो जगदीश आहे. त्याच्या सत्तेशिवाय सर्व व्यर्थ आहे.

सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें
परंतु तेथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे.

त्या भगवंताची कृपा असल्याशिवाय कांहीं होत नाहीं. तेव्हां

बाळ, अण्णा त्याची कृपा संपादन केली पाहिजे. त्याचं अधिष्ठान असल्याशिवाय आपलं बरं व्हावयाचं नाहीं.

"सकल कर्ता परमेश्वरू । आपला माइक विचारु
जैसें कळेल तैसें करूं । जगदांतरें ॥

त्याच्या इच्छेविरुद्ध आपल्याला कांहीं करतां येत नाहीं. त्याचं वास्तव्य नेहमीं आपल्या घरांत पाहिजे.

**बाळ:**—आई, काका आले मला वाटतं, पाय वाजले त्यांचे.

**सावित्रीबाई:**—पाहिलं, आज एक सर्ग देखील संपला नाहीं, बरं चला ते येतील इकडे. बाळ, हा पाट उचलून ठेव बरं जागच्या जागीं. [बाळ पाट एकीकडे ठेवितो, सर्व जातात].

---

# अंक पहिला.

## प्रवेश दुसरा.

[ **स्थळ:**—सखारामपंतांच्या घरांतील त्यालाच लागून असलेलं माजघर, काठीवर वाळत असलेलें लुगडें व खुंटीवर बाळ, अण्णाचे सदरे, कोट व साधारणपणें माजघरांत असणाऱ्या कांहीं वस्तू आहेत. **पार्वतीबाई**–सुमारें २४।२५ वर्षें वयाची रागीट मुद्रा व सडपातळ बांध्याची, कपाळाला आठ्या घातलेली, एकिकडे बसली आहे. **सखारामपंत**–सुमारें ४०।४५ वर्षांचा एक पोक्त मनुष्य, एक

फाटका फेटा कसा तरी डोक्याला गुंडाळलेला व एक मळकें उपरणें खांद्यावर घेतलेला प्रवेश करतो. ]

**सखारामपंतः**—[ घरांत आल्यावर सगळीकडे पाहतो ] अरे वा ! ही गेली कुठें ? [ पार्वतीबाईला एका कोपऱ्यांत बसलेली पाहतो ] अग, तूं अशी कां बसली आहेस ? बोलत कां नाहींस ? राग आला वाटतं कशाचा ? [ डोळ्याला पदर लावून रडते ] अं ! रडायला लागली ! वा ! म्हणजे झालं काय ? पत्रबित्र तर कोणाचं आलं नाहीं ना ?

**पार्वतीबाईः**—कांहीं नाहीं.

**सखारामपंतः**—[ त्रासिकपणानें ] पण आतां बोलल्याशिवाय मला समजणार तरी कसं बुवा ! कांहीं झालं नाहीं मग अशी रडतेस कां ?

**पार्वतीबाईः**—[ रागानें ] मला रडावसं वाटतं म्हणून रडतें. मेली रडण्याचीही चोरी कीं काय ?

**सखारामपंतः**—अग पण येवढं रागवायला झालं तरी काय ? कांहीं कारण तर असेल ना ?

**पार्वतीबाईः**—कांहीं नाहीं मला आपलं माहेरी जाऊं द्यां ह्मणजे आपणही सुटलांत आणि मीहीपण सुटलें.

**सखारामपंतः**—ह्मणजे आतां काय करावं बुवा ! घरांत कोणी त्रास दिला कां तुला ?

**पार्वतीबाईः**—व्हावयाचं काय ? कंटाळा आला. दोन दिवस जातें माहेरी. मला ठाऊक आहे, तुह्माला माझा कंटाळा आला आहे.

**सखारामपंतः**—मी असं कधीं ह्मटलं ? कांहीं तरी बोलायचं आणि उगाच त्रास करून घ्यायचा याला काय ह्मणावं !

**पार्वतीबाई:**—राहिलं आहे काय माझ्यांत आतां. हाडन्‌हाड मोजून घ्याल अशी तर स्थिति झाली आहे. परवाच माझा भाऊ आला होता तेव्हां ह्मणाला, "ताई अशी इथें आल्यापासून रोड कां झालीस?" ह्मटलं बाबा माझी कर्मदशा दुसरं काय?

**सखारामपंत:**—ह्मणजे तुला होत आहे तरी काय? तुझं कांहीं दुखतं कां आहे? मग स्पष्ट तसं मला सांगत कां नाहींस? अं! काय ग? काय ह्मणते तरी काय? कांहीं कळतच नाहीं!

**पार्वतीबाई:**—माझ्यासारखी सहन करणारी मीच, पण कांहीं झालं तरी कां दगडधोंडा थोडाच आहे! सहन तरी म्हणून किती करील! त्यालाही कांहीं सीमा आहे कां नाहीं? आजपर्यंत सांगितलं नाहीं आणि कुणाला सांगणार पण नाहीं.

**सखारामपंत:**—सांगणार नाहीं म्हणजे मग कळणार कसं? तुला कोणी बोललं कां? घरांत येऊन जाऊन ती सावित्री बाईच नां? तिचा कोणाला त्रास नाहीं. बरं ती घरांत असून नसून सारखीच. तिची मुलंहीं कांहीं अधिक नाहींत, मग तुला कोणाचा सासुरवास आहे?

**पार्वतीबाई:**—[ रागानें ] जिवंत आहेत माझ्या सासूबाई! मेल्याचा कांहीं आनंद वाटावयास नको. मानानें वडील मी, पण वयानें वडील त्या ना! बोलणीं तरी किती सहन करायचीं?

**सखारामपंत:**—तुमचं पटत नाहीं, हे कां आज कालचं आहे? मग आज येवढं उकरून काढण्याचं कारण काय? मलाहि पण वाटतं कीं, जर नीट जुळवून घेतलं तर वहिनी कांहीं इतक्या वाईट नाहींत.

**पार्वतीबाई:**—म्हणजे! ( रोखून पहाते ) अगबाई, मीच ती वाईट नाहीं? चांगुलपणा तो सगळा आपल्याकडे! त्या म्हणताताच,

भाऊजी कीं नाहीं फार फार चांगले! काय ती मेली वाईट मीच कीं नाहीं? आपल्या सारखी मी नाहीं अजून साधू झालें! आपल्याला कोणी खेटरं मारलीं काय, आणि तोंडांत शेण घातलं काय सारखंच!

**सखारामपंतः**—हं, हं, पुरे, माझं आपलं राहूं दे, माझं हें जन्मभर असंच चालायचं. पण तिनें आपलं वाईट काय केलं? तिला कधीं वाईट बोलतांना देखील नाहीं बुवा पाहिलं!

**पार्वतीबाईः**—(आश्चर्यानें) हं! तिनं काय वाईट केलं? पायगुणाच्या मोठ्या चांगल्या कीं नाहीं! आमचे मामंजी गेले, सासूबाई गेल्या, पटापटा, वर्ष सव्वावर्ष होतं न होतं तोंच भरलेलं घर कसं रिकाम झालं; भाऊजी काय जाण्यासारखे होते? पण बाईचा पायगुण मोठा चांगला कीं नाहीं! मुलंबाळं टाकून चालते झाले बिचारे. तरी ह्मणतां कीं, तिनं आपलं काय वाईट केलं? बाईचा पाय घरांत शिरला, आणि भरलेलं घर कसं झालं आहे आतां? पण मी ह्मणतें, वाई झालं तें झालं. त्याचं काय आतां? पण आहे त्यांचा तरी कां छळवाद करतां?

**सखारामपंतः**—तिनें काय छळ केला तुझा? आहे घरांत तर जुळवून घेतलं पाहिजे! त्याला काय बरं इलाज? त्यांना कोण आहे बरं माझ्या शिवाय जगांत?

**पार्वतीबाई**—मेलं आह्मी स्वतंत्र व्हावं तरी केव्हां! ह्मातारपणीं मान हालायला लागल्यावर कीं काय? नशिबानं सासू नाहीं तर ही मेली आहेच! (सावित्रीबाई व बाळ अण्णा येतात) मला आतां अगदीं सहन होत नाहीं, मी आपली स्पष्ट सांगतें, त्यांना तरी ठेवा घरांत, नाहींतर मला तरी ठेवा. नाहींतर मी कांहीं जिवंत रहायची नाहीं. (सावित्रीबाईकडे पाहते) ह्या बघा कशा कानोसा घेऊन ऐकतात. जन्माची खोड, ती कां जाणार आहे?

सावित्रीबाई:--( शांतपणानें ) मी काय तुम्हाला म्हटलं! एवढं माझ्यावर रागवायला काय झालं?

पार्वतीबाई:--( रागावून ) मला कुठं येतं आहे असं? बोलून सवरून आणखी असं म्हणतां? माझ्या माहेरच्यांचं नांव कशाला घ्यायला पाहिजे होतं? मला मारा खेटरं आणखी, पण माझ्या आईबापाला कशाला? ( रडूं लागते ) त्यांचं नख नाहीं दिसणार नख! पण त्यांना काय? माझ्या माहेरचे जणूं काय वेशीलाच बांधले आहेत!

सावित्रीबाई:--अहो! पण मी काय बोललें ऐकूं तर द्या?

पार्वतीबाई:--( रागानें ) आणखी खोटीं बोलणीं? चांगल्या दोन लेकरांच्या आई आहेत ना! थोडी लाज वाटायला पाहिजे! मोठ्या बाई असल्या म्हणून काय झालं? आपण आपल्या पायरीनं असावं! पण एवढं कशाला; जितके दिवस सहन करतां आलं तितके दिवस सहन केलं. मी आतां स्पष्ट सांगतें, माझ्याकडून सहन होत नाहीं. एक तर यांना घरांत ठेवा नाहींतर मला तरी ठेवा.

सखारामपंत:--अग पण हें काय? तिनं काय तुझ्या माहेरच्या माणसांना शिव्या दिल्या कां? काय केलं तरी काय?

पार्वतीबाई:--( हातघाईशीं येऊन ) मुलांची शपथ घ्या म्हणावं कीं, माझ्या माहेरच्या माणसाविषयीं मीं कांहीं बोललें नाहीं; कशा साळसूद आहांत साळसूद! अगदी मानभावी आहांत! नाहींतर घ्या शपथ, मग मागं पुढं कां पहातां?

सावित्रीबाई:--बाई! असं हें काय बोलतां? ज्यांच्या करतां मी एवढे वेडे वांकडे दिवस गोड करून घेते त्या माझ्या अण्णाबाळांची या थोडक्याशा कारणावरून कशाला शपथ घ्यायला सांगतां? पोरांविषयीं असं कसं तुम्हाला म्हणवतं?

पार्वतीबाईः—[ रागानें ] अगदीं चालत्या व्हा. या माझ्या घराची पायरी चढाल तर ध्यानांत ठेवा ? हो ! मी आधीं सांगून ठेवतें. मी उगाळली तर देव आहे. नाहींतर अगदीं दगड आहे ! बस, माझं घर आहे, मी तुम्हाला राहूं देत नाहीं. साळसूदपणाचा काय आव आणते ! खरंच—कोणाला वाटायचं कीं, पार्वतीबाईच वाईट ! पण थोड्या दिवसांनीं येईल सगळं सगळ्यापुढें ! बघा तिला नवऱ्याचं मरण कसं मानवलं आहे ! कशी एकसारखी फुगत चालली आहे ! पोरं तरी पहाना मिरमुरली खाऊन पिऊन लाथा मारायला तयार !

सावित्रीबाईः—माझी चूक असेल. मी नाहीं ह्मणत नाहीं. पण कळूं तर द्या मी काय ह्मणालें तें ?

पार्वतीबाईः—मी कांहीं सांगत नाहीं. तुह्मी कांहीं बोलल्या नाहीं ! तुह्मी फार चांगल्या आहांत ! पण माझ्या घरांत राहूं नका.

सखारामपंतः—[ स्वगत ] तरी मला वाटलंच कीं, बरेच दिवसांपासून शिजत आहे, याचा परिणाम चांगला व्हायचा नाहीं. आपण तर हात टेकलें हिच्यापुढें ! मी आपला कुठें तरी जातों ह्मणजे झालं. तुह्मी सर्व शांत झाल्यावर येईन घरांत, ( जाऊं लागतो )

पार्वतीबाईः—कुठं चालला हो ? पहिल्यान्दा यांना घराबाहेर काढा, मग पाहिजे तें करा.

सखारामपंतः—[रागानें] वा ग वा ! ही काय बोलण्याची तऱ्हा ? ह्मणे घरा बाहेर काढा ! ती काय परकी कां आहे ?

पार्वतीबाईः—( सावित्रीबाईकडे पाहून ) मी काय ह्मणतें आहे ऐकलं कीं ? तुह्मी घराच्या बाहेर निघा, नाहींतर कुठं तरी जाते. माझ्याकडून नाहीं आतां सहन होत. जास्त मला बोलायला लावूं नका. आज घराबाहेर निघाल्या तर बरं, नाहींतर मी जिवाचं बरं वाईट करून घेईन.

**सखारामपंतः**—( स्वगत ) आतां कसं काय करावं बुवा ! ( प्रेमानें हळू ) हें बघ असं करणं चांगलं दिसत नाहीं. माझ्याकरितां राहूं दे त्यांना ! लहान पोरंबाळं कुठें ग जातील ? विनायकानें जातांना पोराबाळांना सांभाळ बरं, असं मला बजावून प्राण सोडला. हे त्या बिचाऱ्याचे शेवटचे शब्द मीही कबूल केलें ! आणि तूं त्यांना घाराबाहेर काढून देते; लोक तरी काय म्हणतील ! घरांत भांडा, मारा, वाटेल तें करा; पण चारचौघांत कशाला अपकीर्ति करून घेतां ? पहा मी सांगतों त्यावर आपली मर्जी.

**पार्वतीबाईः**—चला चालत्या व्हा हो तुम्ही माझ्या डोळ्यासमोरून अगदीं ! मी कोणाचं कांहीं ऐकणार नाहीं.

**सखारामपंतः**—( एकीकडे ) वहिनी, तिची इच्छाच आहे तर जात कां नाहीं तात्पुरतं ? कायमचं नाहीं !

( सावित्रीबाई आश्चर्यानें सखारामपंताकडे पाहते ) आपल्याला ठाऊक आहे, ती हट्टी आहे, नाहीं ऐकायची. मग करायचं कसं ! हिच्यापुढें जीव दिला तरी नाहीं ऐकायची. हिच्या तोंडाला तोंड देण्यांत अर्थ आहे कां कांहीं ? पुन्हां हिच्या इच्छेविरुद्ध वागलं आणि हिनं कांहीं बरं वाईट करून घेतलं तर काय करायचं ? हें बघा ! वहिनी ! माझं ऐका. कायमचं नाहीं हिचा राग जाई पर्यंतच !

**सावित्रीबाईः**--मी घराबाहेर जावं असं तुह्मीही ह्मणतां ? भाऊजी ! [ रोखून पहाते ] भाऊजी ! इतके निर्दय कां हो झालां ! कधीं मनांत देखील आलं नाहीं कीं, बाई, आपण धर्मशाळेची वाट मला लेकूरवाळीला दाखवून द्याल आणि भाऊजी, तुह्मीही त्याला संमती द्याल. बाई माझ्या पायाला घाम आला. माझ्यानं आतां उभं राहावत नाहीं हो.

सखारामपंतः--अग, बरं नाहीं हें! मला अगदीं पसंत नाहीं असं वागणं! [स्वगत] अशा माणसाची गांठ पडली, कसं काय करावं?

पार्वतीबाईः--पुरे तुझी माया!

बाळः--आई पुरे ना पण उगीच कशाला इतकं. आपण जाऊं, इथं काय आपल्याला सुखानं तुकडा मिळतो आहे, कीं बाहेर जाऊन आपल्याला मोठ दुःख होणार आहे? आपण आहोंत आणि हें एवढं मोठं जग आहे.

अण्णाः--(लाडांत) कां ग आई कुठें जायंचं? आगगाडींत बसून जायचं कां ग? आपल्या बरोबर काका येतील कां? [काकाकडे पाहून] काका? आई रडते हो!

सावित्रीबाई--[डोळ्याला पदर लावते] अण्णा आतां आपल्याला या घरांत रहावयाचं नाहीं! काका आपल्यावर रागावलेत रे! काका आतां तुझे नाहींत.

अण्णाः--[पळत जाऊन काकाला मिठी मारतो.] नाहीं, माझे काका आहेत.

पार्वतीबाईः--मेल्या बोल तर खरं मुडदा पाडीन! चालता हो माझ्या घरांतून?

सखारामपंतः--अग हें काय? काय बोलतेस? ब्राह्मणाचं घर आहे! लहान आहे तो. त्याच्यावर कां एवढा राग? त्याला काय समजतं?

अण्णाः--काका! पहा हो, ही काकी मला बोलते. ही नको काका आपल्या घरांत! ही फार मारते आह्मांला.

बाळः--काका! तुह्मी तरी विचार करा. एकदम घराबाहेर जायाला सांगूं नका. बाबा असतांना, ते नाहीं नाहीं ह्मणत असतांना

तुह्मी आमचे लाड पुरावावेत, आणि आज घराबाहेर काढून देतां ? काकीचं एकूं नका. यावर आपण काढूनच दिलं तर आहे आमचा वाली परमेश्वर! देवानें आम्हांला उत्पन्न केलं तर चतकोर भाकरीची सोय कुठंतरी लावलीच असेल.

**सावित्रीबाई:**—भाऊजी, मी काय आपणाला सांगूं शकणार? आपल्यासमोर बोलायची मला अजून भीति वाटते. आपल्याला कांहीं सांगेन म्हटलें तर माझी योग्यता नाहीं. आपली अमर्यादा होत असेल, पण आठवण करून दिल्याशिवाय रहावत नाहीं. त्यांच्या जवळ आपण कबूल केल्याप्रमाणें माझ्या लेकुरवाळीचा सांभाळ कराल, पोरांना लहानचं मोठं कराल, म्हणून मी निर्धास्त होतें हो! मला कशाचीही काळजी नव्हती. घरांतल्या भांडणाचं माझ्या ध्यानीं मनीं देखील नाहीं कीं इतक्या थरापर्यंत गोष्ट जाईल! घरांत असल्यावर भांड्याला भांड लागायचंच. त्याचा परिणाम असा व्हावा कां? पण भाऊजी, मी आज खरंच एक निराश्रित अबला झालें काय हो! माझा कोणी वाली नाहीं कां? माझ्या संरक्षणाची आणि माझ्या बाळांच्या शिक्षणाची सोय आतां मीच करूं काय? आम्हांला फुकट पोसायला आतां कोणी तयार नाहीं कां? भाऊजी माझ्या डोळ्यांसमोर काजवे चमकायला लागलेत हो. मला जगांत कोणी उरलें नाहीं. भाऊजी, कोणाच्या दारीं जाऊं आणि भीक मागूं? मग माझ्या बाळांचं कसं होईल? ते गेल्यापासून असं——— कधीं कोणाला दाखवलं नाहीं; आज माझ्यावर हा केवढा प्रसंग! मी माफी मागतें. मी पाया पडतें. मी बायको माणूस कुठं जाऊं! घरांत बाईसाहेबांचें वाटेल तितकें बोलणें खाईन, पण चार लोकांत नका हो माझी फजीती करूं? (जाऊन पार्वतीबाईचे पाय धरिते)

**पार्वतीबाई:**—व्हा, दूर व्हा, घर माझं आहे. आतांच्या आतां चालत्या व्हा!

**सावित्रीबाई**—बाई, जाईन हो एकदोन दिवसांनीं; भाऊजी कुठें सोय लावूल देतील मग जाईन. यावेळीं मी जाऊं कुठें आणि राहूं कुठें ?

**पार्वतीबाईः**—नाहीं. मी मराठींत सांगतें आहे ! अर्थ नाहीं कां कळत ! आतांच्या आतां गेलं पाहिजे. माझ्याशीं जास्त बोलूं नका. मी अगदीं निर्दय आहे.

**सावित्रीबाईः**—असं हो काय करतां ? जेवण नाहींना झालं अजून मुलांचं !

**पार्वतीबाईः**—सांगतेना, मी अगदीं निर्दय आहे म्हणून ?

**सखारामपंतः**—(रागाचा आव दाखवून) कांहीं जायचं नाहीं. पाठविते कुठें ग त्यांना ? मी संतापलों तर माझ्या सारखा वाईट मनुष्य नाहीं ! आपण गरीब व्हावं तितकं जास्तच ! वा ! तिसरी बायको म्हणून मी डोक्यावर बसवून ठेवणारा नाहीं. पायांतला जोडा पायांतच ठेवीन.

**पार्वतीबाईः**—(मोठ्यानें) पुरे, मी कोणाचं ऐकायची नाहीं. आतां इतके दिवस झाला तेवढा छळ पुरे आहे.

**अण्णाः**—( काकाचा हात धरून ठेवतो ) मी नाहीं सोडीत तुम्हाला काका ! आई, रहाग इथें. तुम्हीच जाहो काकी, तुम्ही नको आम्हांला.

**सावित्रीबाईः**—(स्वागत) अण्णाला कांहीं समजत नाहीं ! अण्णा ! तुझ्यासारखं साधंभोळं मन माझं असतं तर मी किती रे सुखी झालें असतें ! (उघड) अण्णा ! आतां काका, तुझे राहिले नाहींत. ते काकीचे काका झाले बरं ! आजपासून आपण लोक झालों !

**बाळः**—[रागावून अण्णाला हाक मारतो] इकडे ये रे ! तिकडे

कांथ उभा राहिला आहेस? इतकी धुसपुस चालली तरी हा "आमचे काका" "आमचे काकाच" करतो आहे! चल येतो कां नाहीं?

**सखारामपंतः**—वहिनी, हिच्यापुढें जीव दिला तरी ही ऐकायची नाहीं. दुसरें बिऱ्हाड करून देतों तुम्हाला. कांहीं काळजी करूं नका. तुमची सगळी सोय करून देईन. थोडं लांब राहिलं म्हणून काय झालं? मी तुमची सगळी काळजी घ्यायला तयार आहे ना?

**पार्वतीबाईः**--घ्या तें काठीवर वाळत आहे तें लुगडं आणि व्हा बाहेर पाहूं?

**सावित्रीबाईः**—भाऊजी! मग मी जाऊंच कां? बायकोच्या प्रेमापुढें पाठच्या भावाचं प्रेम आपल्याला तुच्छ वाटायला लागलं कां? भाऊजी! स्वर्गांत त्यांच्या आत्म्याची काय स्थिति होत असेल? त्यांच्या पश्चात् आणि त्यांना वचन देऊन मुलाबाळांची ही अशी...

**पार्वतीबाईः**--पुरे झाली बडबड, आपापल्या पायरीनें बोलत जा. काय घ्यायचं असेल तें घ्या, आणि व्हा चालत्या पाहूं? माझं रक्त उगाच आटवूं नका.

**सावित्रीबाईः**—(लुगडें व कांहीं कपडे घेते व गाठोडें बांधते.) बाळ, अण्णा बांधा आपली आंगरखा टोपी. पुढं या घरांत आपल्याला पांय ठेवायला मिळणार नाहीं. [बाळ, अण्णा खुंटीवरून कपडं घेतात व गाठोडं बांधतात.]

**सखारामपंतः**—अग, पहा अजून तरी कांहीं दया येऊं दे! तूं माझ्या तोंडाला काळं फांसशील. गांवांत मला तोंड काढूं देणार नाहींत. विचार कर? (पार्वतीबाई कांहीं बोलत नाहीं.)

**सावित्रीबाईः**—भाऊजी, येतें बरं! पण--पण आमच्याकडे पहात जा मधून मधून. [नमस्कार करिते.] बाई, येतें बरं, मी आहें

तों पर्यंत माझ्या अण्णा बाळाचं मी पाहिनच, पण माझ्या पश्चात् अण्णाबाळाला तुमच्या शिवाय कोण आहे ! माझं जगणं सगळं अण्णा बाळाकरितां आहे.

(पार्वतीबाईना नमस्कार करिते. ती तोंड फिरवून बसते.)

**अण्णाः**––काका मीहि जाऊं कां हो ? मग आह्मांला पोहों-चवून द्या !

**सखारामपंतः**––चला, मी येतों बरोबर.

**पार्वतीबाईः**––कांहीं जायचं नाहीं. (परत फिरतो.)

(सावित्रीबाई जाऊं लागतात.)

**पार्वतीबाईः**––अहो ! तो तांब्या ठेवा खालीं ? कोणाचा घेतला तो ? आतांपर्यंत लुटलं तें कमी कां झालं ? माझ्या डोळ्यासमोर मी कांहीं घेऊं द्यायची नाहीं ! ठेवा ! काढा गाठोड्यांतून !

**सावित्रीबाईः**—मी माझ्या माहेरची आणलेली आहे लोटी ती. असें काय हो करितां ? पोरांना तहान लागली तर पाणी प्यायला नको कांहीं ?

**पार्वतीबाईः**––नांव आहे कां तांब्यावर ? मला शिकवितां काय ? काढा लोटी ! वा ! मोठ्या शाहण्याच आहांत [सावित्रीबाई गाठोडें सोडते, व तांब्याकाढून ठेवते. व पुन्हां बांधते व कमेरवर घेते]

**अण्णाः**––काका, तुम्ही नाहीं येत ? आम्ही एकटेच जाऊं ? मग आम्ही काका कोणाला म्हणावं हो ?

**सावित्रीबाईः**—अण्णा, मी आहेना ! चला, आतां. (जातात)

(पडदा पडतो.)

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

[ स्थळ:—सावित्रीबाईनें भाड्यानें रहावयास घेतलेली एक खोली. बाळ, अण्णा शाळेंत जाण्याच्या तयारींत आहेत. ]

बाळः—आई, झालं तें उत्तम झालं. अपमान तरी किती दिवस सहन करावयाचा? नकोत कोणाचीं तीं बोलणीं, आणि कोणाचे उपकारही नकोत. काकी, म्हणावं तुमच्या घराची पायरी कधीं कधीं सुद्धां चढणार नाहीं! माझ्या समोर माझ्या आईचा अपमान करते काय? आई, तूं बोलूं देत नाहीं ह्मणून, नाहींतर मी काकाची चांगली कान उघाडणी केली असती! अग यांना कां पुरुष ह्मणावं! बायकांपेक्षां बायका ह्या. मी तरी काय करूं? मी फार लहान आहे. मी या वेळीं जर मोठा असतों तर किती चांगलं झालं असतं! नोकरी करीन ह्मणावं तर अझून माझं शिक्षण झालं नाहीं. आई, मला नोकरी मिळेल कां ग? शिपायाची--कशाची तरी?

सावित्रीबाई:—बाळ, तुझं कां नोकरी करण्याचं वय आहे? दोन दिवस सुखाचे, दोन दिवस दुःखाचे हे लागलेच आहेत. मग वाईट वाटून घेण्यांत काय बरं अर्थ आहे? जो परमेश्वर किड्यामुंग्यांना सांभाळतो, तो नाहीं कां आपल्याला सांभाळणार?

बाळः—काकी घरांत आल्यापासून आमच्यावरची काकांची माया कमी कमी होत चालली होतीच. पूर्वीं पूर्वीं आमचा किती लाड! आम्ही रडायला लागलों तर त्यांच्या डोळ्यांत पाणी यायचं, पण आता

वघाना कसे बाईलबुद्धे झाले आहेत. बायकोकरितां माणसानें माणुसकी सोडणें म्हणजे काय ?

**सावित्रीबाई**:--असं बोलूं नये आपण. कांहीं झालं तरी तीं वडील माणसं आहेत.

**बाळ**:--खरं असलं तर बोलायची कोणाची भीति कां आहे. जें खरं असेल तें वाटेल त्याच्या समोर बोलायला मी नाहीं भिणार.

**सावित्रीबाई**:--बाळ, तूं लहान आहेस, तुला कळत नाहीं. आपल्याला किती जरी त्यांनीं दूर केलें तरी त्यांच्या खेरीज आपल्याला कोण आहे ? नाहीं म्हणायला चंद्रीची आई मात्र आहे. बाळ, चंद्रीची आई फार चांगली बरं ! त्यांनीं किती मदत केली आपल्याला. एक दिवसभर त्यांच्या बरोबर जेव्हां फिर फिर फिरलें, तेव्हां कुठें हें चंद्रकान्त साहेबांच्या घरीं स्वयंपाकाचं काम मिळालं. चंद्रीच्या आईचं, ना नातं ना गोतं, पण एवढी खटपट करून ही लहानशी खोली पाहून दिली. ती होती म्हणूनच बाळ मला हें काम पण मिळालं. ती नसती तर परवां आपल्याला जेवायला देखील मिळालं नसतं बरं ! घरीं येऊन जाऊन; चार गोड शब्द बोलून, येवढ्या खस्ता खाणारं आज कोण आहे ? चंद्रकांत साहेबांनीं स्वयंपाकाचं काम दिलं म्हणून आज खायाला तरी मिळतं, नाहींतर मला नाहीं सुइणीचं काम येत, नाहीं दुसरं कांहीं येत. मास्तरीण होऊं म्हटलं तर इनमिन माझीं तीन बुकं झालीं. मी कसं मुलींना शिकविणार ? मग राहता राहिला आम्हा बायकांचा अखेरचा धंदा म्हणजे स्वयंपाकाचा. त्याच्याशिवाय मला कोणची कला अवगत आहे ? कोणाच्याही घरीं मोल मजूरी करायची आणि पोट भरायचं ! बाळ आम्ही जुन्या चालीच्या बायका, आम्हाला कसचं शिक्षण आणि कसचं काय ? कोणाच्या तरी आश्रयानें रहावयाचं. पण बाळ पूर्वींचे दिवस नाहीं राहीले आतां ! [ थांबते ] बरं, जा, शाळेला तुम्हाला उशीर होईल ! तुही चांगले हुशार व्हा, निघून जातील हेही दिवस.

**बाळ:**—दिवस आले आहेत असे, त्याला इलाज नाहीं. आई, तुला मला जर देवानें पुष्कळ आयुष्य दिलें तर, आपल्या घरीं एक स्वयंपाकीण ठेवूं.

**सावित्रीबाई:**—हं, पुढच्या पुढें! [ थांबते ] लीलावती-बाईसाहेब—ज्यांच्या घरीं मी स्वयंपाक करितें त्या—देखील म्हणाल्या कीं दुपारीं येत जा बसायला. तुम्ही कांहीं मनांत वाटूं देऊं नका पण मला तेथें कसं बरं वाटेल? जेथें मानापानानें जायचं तेथें मी त्यांची स्वयं-पाकीण म्हणून मला कसं बरं जाववेल? माझ्या नशीबाची ददात कधीं जाईल देवाला ठाऊक! माझी सगळी भिस्त बाळ, अण्णा तुमच्यावर आहे. लवकर शहाणे व्हा बरं!

**बाळ:**—आई, असं काय ह्मणते? परिस्थिति बदलली ह्मणून माणूस बदलत नसतं. स्वयंपाक करण्याची पाळी आली म्हणून लीला-वतीबाईपेक्षां तुझी योग्यता कोणत्या दृष्टीनें कमी झाली?

**सावित्रीबाई:**—लीलावतीबाई देखील दुजाभाव ठेवीत नाहींत. एक दिवसाच्या अनुभवानें कांहीं सांगूं नये. पण, बाई फार चांगली दिसते. बरं तुह्मी जा शाळेंत. मीही जातें साहेबांच्या घरीं [ बाळ, अण्णा जाऊं लागतात ] दोघेही बरोबरच या बरं कां? बाळ, अण्णाला सांभाळून आण. ( बाळ, अण्णा जातात. )

( स्वगत ) या अफाट जगांत मी एकटी आणि माझीं दोन मुलं! या खेरीज माझें म्हणून म्हणायला आहे कां कोणी? कोणी नाहीं. मला कोणाचं पाठबळ नाहीं. आज जगांत पहावं तर लोकांनीं अब्रू विकून टाकली आहे. माझी कींव करण्याऐवजीं सगळे लोक माझी मजा पहाणारे आहेत. त्यांत एकटं माझ्या सारख्या अबलेनें राहणं तर फार फार धोक्याचं झालं आहे. या उघड्या जगांत माझं संरक्षण करणारा

केली नाहीं असा विचार मनांत आला म्हणजे पोटांत कसं धस्स होतं. बाळ, अण्णाची सर्व जबाबदारी आतां मजवर आहे. देवा! बाळ, अण्णाला मोठें कर. त्यांना उदंड आयुष्य दे. माझं सगळं त्यांच्या करितां आहे. ( जाते )

# अंक दुसरा.

## प्रवेश दुसरा.

[ स्थळ–सखारामपंतांचं घर, पार्वतीबाई व चंद्रीची आई बसल्या आहेत. चंद्रीची आई, ३०।३५ वर्षांची बरीच चाणाक्ष, उलाढाली करण्याची सवय. परंतु स्वभाव सरळ ]

**पार्वतीबाई:**—चंद्रीची आई, तुम्हीच पहा कीं दोन दिवसांत एकदां तरी सावित्री आली कां? काय मेला माजोरा स्वभाव! चंद्रीची आई, तुम्ही जर माझ्या ठिकाणीं असत्या तर दुसऱ्याच दिवशीं कंटाळून गेल्या असत्या. इतके दिवस मी त्यांच्या सहवासांत कसे काढले असतील आणि कसे नाहींत, माझें मला ठाऊक!

**चंद्रीची आई:**—[ आश्चर्यानें ] बाई, असं कसं हो तुम्ही म्हणता! तुम्हीच काढून दिलं ना त्यांना! येतील कशा तुमच्या घरीं?

**पार्वतीबाई:**—[ मोठ्यानें ] काय? काढून दिलं? चांगलं आहे बाई! अहो नुसतं सांगितलं कीं आज काल दिवसमान कठीण आहे, आपण आपलं ओझं दुसऱ्यावर कशाला टाकावं? त्यांत, दोन

मुलं, तुम्हीच सांगा काय लागत नाहीं ? आज दिवस तर पडले हे असे, तेव्हां नको का आपण आपले समजून जायला ?

**चंद्रीची आईः**—समजली ती आतां काय करते न समजून. कावाड कष्ट करून भरते कसं तरी पोट. पूर्वी काय ऐश्वर्य होतं तिचं, नाहीं देवाला पहावलं !

**पार्वतीबाईः**—हें बघा तसं म्हणूं नका. तुम्हीच सांगा कीं माझ्याकडून कांहीं चूक आहे का ? खरें सांगा ? असें तोंडापुरतें नको ! आज मी असं ऐकलं कीं त्या साहेबांच्या घरीं राहिल्या आहेत ! झालं कीं नाहीं मग ! अहो सांगतें काय कीं अगदीं मोकाट सुटल्या आहेत. कोणाचं हूं म्हणून घ्यायच्या नाहींत ! बायकांना हें शोभतें काय ? तुम्हीच सांगा ?

**चंद्रीची आईः**—तें सर्व खरं ! पण हें बघा, सावित्रीबाई जर घरांत दिवसचे दिवस रडत बसून राहिल्या तर त्यांचं पोट कोणी भरणार आहे कां ? प्रसंग आला तेव्हां चार लोकांत जावंही लागतं, कामं करावींही लागतात ?

**पार्वतीबाईः**—चंद्रीची आई, त्यांत फरक आहे. असं कसं म्हणतां तुम्ही ? त्या साहेबांच्या घरीं--अहो काय सांगूं, झाकलेली मूठ कां उघडायला लावतां ?

**चंद्रीची आईः**—असं ! मी बाई पहिल्यांदांच ऐकतें !

**पार्वतीबाईः**—माझ्याकडून कांहीं चूक असेल तर अगदीं माझ्या तोंडावर सांगा कीं, बाई, तुम्ही म्हणतां खरं पण तुमचं अमुक अमुक करणं आपल्याला पसंत नाहीं. मला कांहीं राग यायचा नाहीं. काय सांगूं, मला किती वाटतें कीं मुलांना कांहीं तरी आपण करावं म्हणून. पण कधीं कधीं म्हणून माझ्याकडे पाठवायची नाहीं. जणूं काय

मी विष देऊन मारणार आहे ! मुलंही मेलीं अशीं चाहटळ आहेत कीं कांहीं विचारू नका. त्यांतल्या त्यांत बाळ तर फारच आहे, नशीब त्यांचं मी तरी काय करणार !

**चंद्रीची आईः**—कांहीं झालं तरी त्यांना मदत करीत जा. ते आपलेच आहेत ना !

**पार्वतीबाईः**—( मोठ्यानें ) मदत ! खरं म्हणाल तर माझ्याकडून बाई राहवतच नाहीं. आणि आमच्या आईबापांनीं नाहीं आम्हाला असं शिकवलं. आमचं आपलं जुनं चालत आलं आहे तेंच. हे नवीन चाळे नाहीं आम्हाला शिकविले. पण लांब कशाला जा. खात्री होईल तुमची, जरा वाट बघा थोडी.

**चंद्रीची आईः**—काय ? कशाची वाट बघायची ?

**पार्वतीबाईः**—काय तोंडाला अमंगळ बोलायला लावता बाई ! मीं त्यांना कितीदां सांगितलं कीं, कुठें काशी, नाशिक, करून या. कुठं क्षेत्राला जाऊन या. तळपायाची आग मस्तकाला जाते ! हो, मी सर्व समजते, कुठं जाऊन आल्या तर असे ढंग कसे करायला मिळतील ? तुम्हीच सांगा. या वयांत, त्यांतून रूप हें असं, मग चार चौघांत नेहमीं वावरणं चांगलं कां ! पण सांगावं कोणीं ! स्वभाव पडला असा, त्या कसल्या ऐकायला गेल्या ! काय मनांत असेल बाई त्यांचं त्यांनाच ठाऊक! [ हळू ] हें बघा, तुम्ही आपल्या घरच्यासारख्या म्हणून तुमच्या जवळ बोलतें हो, नाहींतर मी बसलें आहे सांगायला !

**चंद्रीची आईः**—कांहीं तरी तुम्ही बोलतां झालं. सावित्रीबाई तशांतल्या नाहींत बरं. कुठें कोणीं कांहीं सांगितलं असल त्याचा तुम्ही हा असा अर्थ काढला. बालसंगोपनाखेरीज दुसरं कर्तव्य जगांत तिला उरलं नाहीं. तिच्याविषयीं शंका घेणें म्हणजे खरोखर पाप आहे.

**पार्वतीबाई:**—मला वाटलेंच कीं, तुमचा विश्वास बसणार नाहीं आणि म्हणूनच म्हणतें थोडे दिवस थांबा, म्हणजे तुम्हीच ऐकाल. तुम्ही ओळखलंच कुठें! गोगल गाय आणि पोटांत पाय! हो, एकदां माणसानं लाज सोडली कीं त्याला परगांव काय आणि आपलं गांव काय सारखंच बरं! कारण आहे त्याला, अहो कोणाचा धरबंध राहिला नाहीं. जणुं काय नवऱ्याच्या मरणाची वाटच पहात होत्या! मी झालें तरी किती अब्रु झाकणार! हे असे ढंग करून कुणाचा हात धरून जातील झालं. इतकं स्वरूप पुन्हां लोकांतून नेहमीं मिरवायचं तेव्हां बाई काय होईल काय नाहीं हें काय सांगवतं. लोक तर मेले टपलेलेच असतात. पुन्हां यांची आंतून संमति असली म्हणजे झालं!

**चंद्रीची आई:**—मी अगदीं वेड्यासारखी तुमचं ऐकतें आहें! ऐकावं तें सगळं नवीनच! पण काकू, तुम्ही कितीही सांगा, आपल्याला खरं वाटत नाहीं. [सखारामपंत येतात] हे आलेच, सांगा काय सांगायचं तें?

**पार्वतीबाई:**—यांना सांगून उपयोग नाहीं व्हायचा. इकडून हें असं वागणं आहे म्हणून तर हे त्यांचे असे चाळे आहेत! कोणाला सांगायला नको! मी आपलं येवढंच म्हणतें कीं, दृष्टि आड सृष्टि! डोळ्याला आड येऊन कांहीं करा. आम्ही येतों आहोंत कां कांहीं बोलायला?

**सखारामपंत:**—म्हणजे आहे कसं काय? काय जें असेल तें स्पष्ट सांगाना? मला असं मोघम कधीं कळत नाहीं.

**पार्वतीबाई:**—म्हटलं सावित्रीबाई—[थांबते]

**सखारामपंत:**—पुढें काय? नुसतं सावित्रीबाई म्हटल्यानें मी काय समजूं?

**पार्वतीबाई:**—तुह्माला कांहीं समजायचं नाहीं ! चंद्रीची आई, यांना सांगून कांहीं उपयोग होणार आहे काय ?

**चंद्रीची आई:**—तुम्हाला काय सांगायचं आहे तें सांगून ठेवा.

**सखारामपंत:**—काय सांगणार वहिनीविषयीं ? तिची गोष्ट निघाली म्हणजे खालीं पाहण्याची वेळ येते. मी सांगतच होतों, पहा बरं, हें चांगलं नाहीं अशांनीं आपली अब्रू जाईल ? पण माझं कोण ऐकतो ! स्वर्गांतून तो विनायक मला काय म्हणत असेल, आणि बिचाऱ्या वहिनी तरी काय म्हणत असतील ?

**पार्वतीबाई:**—बरी तुमची बिचारी ! कुळाची लाज नाहीं अशी बिचारी काय कामाची ! आणि लोक लोक काय करतां ? लोकांना काय ठाऊक आहे तिचं ?

**चंद्रीची आई:**—[ स्वगत ] जावं झालं आपण आतां, इथं यांची मजा पाहण्यांत काय अर्थ आहे ? [ जाते ]

**सखारामपंत:**—वा ! भीक मागितल्यानें कुळाला बट्टा लागतो. मग दोन्ही गोष्टी कशा व्हावयाच्या ! पोटभर द्यायचंही नाहीं आणि भीकही मागूं द्यायची नाहीं !

**पार्वतीबाई:**—ज्या कुळांत मी आलें त्या कुळाच्या नांवलौकीकाची मला चाड आणि आपलं पाहिलं तर हें असं ! थोरामोठ्यांची अमूक अमूक म्हणून म्हणवून घ्यायचं आणि दिव्याखालीं असा अंधार ! मला नाहीं बाई असं खपायचं !

**सखारामपंत:**—वारे वा ! अग हें सर्व तुझ्यामुळेंच झालं ना ? मी काय केलं ?

**पार्वतीबाई:**—पुरे पुरे, कुळाचा कांहीं तरी अभिमान ठेवावा. इतके कुळाचे धिंडवडे आपली भावजय काढते, आहे का नाहीं ठाऊक ? मी परक्याच्या इथली पण नाहीं बाई सहन करवत ! काय काय कानावर येईल दररोज आणि काय नाहीं ! दररोज कांहीं नवलच ! [ हळूच ] म्हटलं सावित्रीबाई, साहेबांच्या घरीं राहिल्या आहेत ! केलें कीं नाहीं त्यांनीं साहेबांच्या बायकोच्या जन्माचं मातेर ! सांगा ! सखारामपंताकडे थोडावेळ पहात राहते ) आतां कांहीं तरी डोळे उघडा, मूग गिळून किती दिवस बसणार

**सखारामपंत:**—म्हणजे !

**पार्वतीबाई:**—[रागानें] तुमचं माझं कर्म ! अगदींच कसं बाई समजत नाहीं ?

**सखारामपंत:**—मला अगदीं खरं वाटत नाहीं. ती बिचारी खरोखर साध्वी स्त्री आहे. मी नाहीं कुठें ऐकलं तें ?

**पार्वतीबाई:**—( स्वगत ) यांना सांगून तरी काय उपयोग ? सांचलेलं पाणी किती दिवस पुरणार ! ( उघड ) अहा तुम्हाला कोण बोलणार ? मला तोंड काढूं देत नाहींत. आपल्याला इथें दिवस काढायाचे आहेत. म्हणून भीक मागावयाचीच असल तर हेंच का गांव उरलं आहे ? उगीच तुमच्या मिळतं आमच्या तोंडाला काळिमा ! मी म्हणतें त्यावर नसेल विश्वास बसत तर राहीलं. [ थांबते ] पण यामध्यें मी कांहीं गैर सांगतें का ? त्यांना सांगा कीं ( खोचून ) तुम्ही फार चांगल्या आहांत पण इथं कांहीं राहूं नका. दुसरीकडे जा हो बाई, तुमच्या वहिनी आहेत ! उगाच तुम्हाला राग यायचा त्यांच्या विषयीं कांहीं वाईट बोललें तर. पण मी म्हणतें, खरं बोललं तर काय गैर आहे ?

सखारामपंतः—कुठं जाईल ग ती ? उगीच का बिचारीला त्रास ! पोरासोरांचं संगोपन करते बिचारी, आपण तर नाहीं काडीची मदत करायची आणि पुन्हां तिच्याबद्दल असं भलतं सलतं बोलायचं ! ती इथं राहिली तर आपल्याला काय त्रास आहे ? (निश्चयानें) मी तिला कांहीं सांगणार नाहीं.

पार्वतीबाईः—(आश्चर्यानें) अगबाई चांगलं राहूं द्या ह्मणता ! याचं तुम्हाला कांहींच वाटत नाहीं ना ! तुमच्या घराची पद्धतच दिसते अशी ? हें बघा मला कांहीं जास्त बोलायला लावूं नका. आणि त्यांना कुठं तरी जायला सांगा.

सखारामपंतः—[ निक्षून ] आपल्याकडून तें व्हायचं नाहीं.

पार्वतीबाईः—तें कांहीं नाहीं, कुठंही जा म्हणावं, पण इथं नका राहूं. माहेरी काय कमी आहे तिच्या ! तिथंही नाहीं पोर ना बाळ ! चार घास सुखानें तरी खाईल. कांहीं बसूं नका. आले तसेच जा परत पाहूं !

सखारामपंतः—[ वैतागून ] त्यांचे माझ्या हातून का उगीच हाल करिते ? अग माझ्या भावाचीं लहान लहान मुलं आहेत तीं ! तुझ्या म्हणण्याप्रमाणें वागणें म्हणजे खरोखरीच अगदीं निर्लज्जपणा आहे. [ उभाच असतो ]

पार्वतीबाईः—कशालाही कीड लागली म्हणजे ती अगदीं कापून काढावी लागते. तसंच कुळाचं ! कुळाला बट्टा लागायला लागला म्हणजे मग काय इलाज ? जा सांगा, म्हणावं [ थांबते ] या गांवांत राहूं नका. बऱ्या बोलांनीं चालत्या व्हा नाहींतर मी एकदां हट्टास पेटलें म्हणजे काय करीन आणि काय नाहीं ह्याचा नेम नाहीं. जा मी काय

यांत वाईट सांगतें ? या गांवांत नाहीं दुसऱ्या गांवांत जा, यांत काय वाईट झालं ? मला तुमचें मोठं नवल वाटतें ?

**सखारामपंतः**—माझा अगदीं विश्वास बसत नाहीं. आणि मी असं तिला साफ सांगणार नाहीं. जाऊन कोणत्या तोंडानें सांगूं कीं वहिनी गांवांत देखील राहूं नका म्हणून ?

**पार्वतीबाईः**—तुम्हाला कांहीं कळत नाहीं ! सांगतें तें त्यांच्याच फायद्याचं सांगतें ! असं काय करतां ? त्या माहेरी गेल्यावर त्यांचं काय वाईट आहे ! माहेरी काय कमी आहे त्यांच्या ?

**सखारामपंतः**—मग काय त्यांना माहेरी जायला सांगूं ? ( थांबतो ) जातील, त्यांना त्यांचं कळतं आहे. थोडा विचार केला पाहिजे. एकदम कांहीं तरी करायचं त्यांत काय अर्थ आहे ? बसतो थोडावेळ. आतां तर आलों. [ कोट काढतो ]

**पार्वतीबाईः**—तुम्ही आतांच जा हो. माझें ऐका. पुढं वेळ असतो नसतो. पुन्हां कांहीं काम निघालं कीं जाल विसरून.

**सखारामपंतः**—आतांच्या आतां एवढी काय बुवा घाई ?

**पार्वतीबाईः**—पण वेळ तरी कां करायचा उगाच ?

**सखारामपंतः**—पण हें बघ, माहेरी जा म्हणून सांगेन. दुसरं कांहीं सांगणार नाहीं, कबूल आहे ?

**पार्वतीबाईः**—हो हो जा.

[ पुन्हां कोट घालून जातो. ]

# अंक दुसरा.

## प्रवेश तिसरा.

[ स्थळ--सावित्रीबाईनीं भाड्यानें घेतलेली खोली. सावित्रीबाई दाराशीं वाट पहात आहे ]

सावित्रीबाई:—[ स्वगत ] बाळ अण्णाला शाळेतून यायला इतका कां बरं उशीर? शाळा सुटल्यावर घरीं येऊन मला विचारल्याशिवाय कुठें सहसा जायचे नाहींत! मग आज इतका कां बरं उशीर? [ दारांत पाहते ] कोण? चंद्रीची आई वाटतं? या आज बरोबर चंद्रीला आणलंत? ( चंद्रीची आई आणि चंद्री—आठ नऊ वर्षांची, बरीच चलाख, प्रवेश करिते. )

चंद्रीची आई:—आणली झालं! मी नसलें घरांत कीं, अगदीं सर्व सामानाची नासधूस करून टाकते. तशी मोठी अधिक आहे ती.

सावित्रीबाई:--कुणीकडे आला एकूं! मी बघत होतें वाट अण्णा बाळांची दारांत!

चंद्रीची आई:--आलें होतें कसं काय चाललें आहे तें पहायला. ठीक चाललं आहे ना? कांहीं अडचण असली तर सांगत जा बरं? अगदीं अनमान करूं नका. निघून जातील हेही दिवस. मागची आठवण देखील येऊं देऊं नका. देव जें करितो तें चांगल्या करितांच करितो. त्याची कृपा असली म्हणजे कांहीं वाईट होत नाहीं.

बोळ अण्णांना कांहीं लागलं तर माझ्याकडे पाठवित जा, मीहि येतच जाईन. [ आठवून ] हो पण आतां सात आठ दिवस कसचं रिकामपण होतं ?

सावित्रीबाईः—कां बरं ?

चंद्रीची आईः—अहो आमच्या यमीचं लग्न जुळलं ! आणि तीथिहि ठरली परवांची ! आतां दोन दिवसांत कसं सामानसुमान तयार व्हायचं ! खरं सांगू कां, घरांतल्या माणसांना कांहीं कळत नाहीं. जरा दूरची तिथी नेमली असती तर मुलाकडचे पुढें नाकबूल कां झाले असते ?

सावित्रीबाईः—बरं झालं एकदाचं जुळलं. तिथीचं काय, होऊन जाईल. कां रहातं आहे ? पण मुली आल्या कां सासरून ?

चंद्रीची आईः—अहो मुद्दाम काल गेले होतेना ! ते सगळ्यांना घेऊन आले. मग कसं करायचं ? दोन दिवस राहिले, पुन्हां गांवांत प्लेगच्या केसिस पूर्वी पेक्षां जास्त व्हायला लागल्या. पूर्वी कसा आहे नाहीं, आहे नाहीं, असा होता. पण आतां एकदम वाढला म्हणतात ! आमच्या शेजारीच एक झाली. आह्मी सर्वांनीं देशमुखांचा मळाच पसंत केला आहे. बरं, पण तुह्मी मुलांसुद्धां चार दिवस तिकडे यायचं. नाहीं, ह्मणायचं नाहीं.

सावित्रीबाईः—लग्न मळ्यांत होणार कीं काय ? मग मोठी मजाच येणार आहे ! बरं बाई आम्हांला नाहीं देवानें सुख दिलं तर तुमच्या सारख्याचं पाहण्यांतच आम्हांला आनंद आहे.

चंद्रीची आईः—बरं आहे, मला नाहीं बोलण्याचा सुमार, केव्हांची धरून बिघालें आहे ! [ आठवून एकदम ] जिथं गेलं तिथं

आपला चहाचा आग्रह ! नको नको म्हणावं पण आधण ठेवल्यावर कां जातां येतं ? एक तास मोडला प्रत्येकाकडे ! तेथून निघालें तें शेजार-पाजारचे सर्व सांगून तुमच्याकडे आतां आलें. बरं येतें [ जायला लागते ]

**सावित्रीबाई:**—थोडं थांबाल तर खरं ? लग्न जमलं कसं ? कुठला नवरा मुलगा हें तर सांगितलंच नाहीं ?

**चंद्रीची आई:**—[ हंसत ] हो, तें मोठं आश्चर्यच आहे. आमच्या ध्यानीं मनीं देखील नाहीं जमेल असं ! पण बोलाफुलाला गांठ म्हणतात ना तशांतली गोष्ट झाली. ते गेले काय; आणि आले ते नारळ देऊनच आले ! नाहींतर आज वर्ष झालं त्यांना विसावा नाहीं. बघा, गांवांतल्या गांवांत पण कोणाच्या ध्यानांत नाहीं. मुलगा चांगला आहे बरं कां ? फारसा शिकलेला नाहीं पण घरचा श्रीमंत आहे. अहो सावित्रीबाई शिकून शिकून तरी आज नोकऱ्या मिळतात कोठें ? आज काल पैसा असल्याशिवाय मुलगी देणं चांगलं नाहीं. मला ठाऊकच आहे गांवांच्या बाहेर त्रास होणार म्हणा, पण बघा पाहुणेमंडळी यायची. कांहीं करतां कांहीं झालं तर अपेश आपल्यावर ना ?

**सावित्रीबाई:**—बरं केलंत, मला पुन्हां बोलावयाला नको. मी येईन.

**चंद्रीची आई:**—साहेबांच्या बायकोला सांगायला पाहिजे असेल तर मी येईन सांगून. तुमच्या साहेबांनीं देखील तिकडेच बंगला पाहिला आहे. कसंही करून या. मी पूर्वीचं नातं विसरलें नाहीं. [ जाते व पुन्हां येते. हंसत हंसत ] पार्वतीबाईकडून जाऊन आलें ! त्यांनाही आमंत्रण करून आलें. कांहीं विचारूं नका त्यांची बोलणीं. मी आपली कांहीं फारसें बोललें नाहीं. नाहींतर बाईंची माझ्यावर नाराजी व्हायची. बरं, बोलण्याला कांहीं सुमार ! तुमच्याविषयीं जी

१०५९ ७१२७

एकदां सुरू होती ती अगदीं शेवटपर्यंत. अगदीं बोलूं नये तें बोलल्या. त्या म्हणे काय अशाच आहेत. त्या म्हणे काय वाईटच आहेत.

**सावित्रीबाईः**—चंद्रीची आई, जों पर्यंत तारुण्य आहे तोंपर्यंत हे दोष मी कशीही वागलें तरी सुटणार नाहीं. लोकांची दृष्टि मोठी मेली वाईट असते. कधीं कधीं कोणाला चांगलं म्हणून म्हणायाचें नाहीं. कुठें चारचौघी जमल्या कीं कोणाचे गुण तर नाहीं कधीं गायचे पण सगळ्यांच्या उखाळ्या पाखाळ्या मात्र निघायच्या. आपण नाहीं पहात ? आपण आपलं निर्मळ असलं म्हणजे झालं.

**चंद्रीची आईः**—अहो पण वैरी देखील बोलायला धजणार नाहीं असं तुमच्याविषयीं बोलत होत्या.

**सावित्रीबाईः**—मी काय केलं आहे कुणास ठाऊक त्यांचं ? मी आणि अण्णा बाळ अगदीं डोळ्या समोर नको ! घराच्या बाहेर तर आतां निघालोंच आहोंत पण एवढं करून देखील त्यांचं समाधान नाहीं झालेलं दिसत. हा काय बाई स्वभाव !

**चंद्रीची आईः**—मला देखील बाई त्यांच्याविषयीं कांहीं बोलायचं म्हणजे भीतीच वाटते. बोलूं नका बरं बाई कोणा जवळ ? नाहींतर उगाच माझ्याबद्दल कांहीं तरी डांगोरा गांवांत पिटायची ! हो त्याचा काय नियम ! ती बाई काय साधी आहे ? फारच जहांबाज बाई ! सावित्रीबाई, माझ्या समोर नवऱ्याची कान उघाडणी करायला कमी नाहीं केलं तिनं ! मला नाहीं ऐकवलं, मी लागलीच चालती झालें.

**सावित्रीबाईः**—काय ह्मणाल्या माझ्याविषयीं ?

**चंद्रीची आईः**—ऐकून तरी काय करायचं आहे तुम्हाला ? एवढंच सांगतें कीं, अगदीं वाईट वाईट बोलल्या. आणि तुम्हाला इथून कुठंतरी दुसऱ्या ठिकाणीं जायला सखारामपंत सांगणार आहेत.

सुमच्यांमुळे त्यांना खालीं पहावं लागतं ! एक एक आठवलं म्हणजे आश्चर्य वाटतं ! एवढं पाण्यांत पहायला काय कारण आहे देवाला ठाऊक !

**सावित्रीबाई:**—त्याला कशाला पाहिजे आहे मोठं सबळ कारण ? बाई, भाऊबंदकीला सुरवात ही अशीच किरकोळ कारणांवरून होत असते. मात्र पुढें पुढें परस्परांना त्यांत मोठ मोठालीं तत्वं दिसायला लागतात. आणि भांडण करण्याकरितां व तें कायम ठेवण्याकरितां तीं मुद्दाम उपस्थित करावीं लागतात. जावा जावांनीं फार दिवस एकत्र राहणं हाच मूर्खपणा आहे. ते खंबीर होते म्हणून कोणाची डाळ शिजली नाहीं. आतां काय भाऊजी म्हणजे भाऊजीच आहेत झालं.

**चंद्रीची आई:**—दुसरं तिसरं तर कांहीं नाहीं तुम्हाला एथून काढण्याच्या पाठीमागें आहेत.

**सावित्रीबाई:**—अहो मी जरी येथून गेलें तरी काय होणार ? अहो हें त्याच्याकरितां नव्हे ? माझ्या जाण्या राहण्यानें त्यांचं काय होणार आहे ? पण त्यांचा स्वभाव त्याला औषध नाहीं ! झालं आहे वाईट त्यापेक्षांहि वाईट करायचं दुसरं काय ? ज्या ठिकाणीं मानापानानें रहात होतें त्याच ठिकाणीं ही अशी भीक मागण्यापर्यंत पाळी आली तरी त्यांचं समाधान नाहीं. [ थांबते ] जें नशिबांत असेल तें घडल्या वांचून कधीं राहणार नाहीं ! [ थांबते ] इथं राहिलें म्हणजे काय ? थोरा मोठ्यांच्या घरची म्हणून लोक माझी थोडी तरी काळजी घेतील, उपयोगीं पडतील या आशेवर राहिलें. दुसरं काय ? [ एकदम आठवण होऊन ] अग बाई अजून कसे माझे बाळ अण्णा आले नाहींत ? ही काय मेली शाळा ?

**चंद्रीची आई:**--येतील हो, झाला असेल उशीर ! मुलं मुलं; आहेत बसले असतील खेळत !

**सावित्रीबाई:**—मागें ऐकत होतें कीं, कोठेंसा पूल बांधणं चालला आहे, तिथं पठाण मुलं धरून नेतात ! डोळ्यादेखत अंगणांत नाचत खेळत असलेलीं मुलं बोलतां बोलतां नाहींशीं होतात.

**चंद्रीची आई:**--तुमचा बाई फारच संशयी स्वभाव ! मन चिंती तें वैरी न चिंती म्हणतात तें खोटं नाहीं. असं कुठं झालं आहे ? कां लोकांना डोळे आहेत कां नाहींत ! असं बरें नेऊ देतील मुलांना डोळ्या देखत ?

**सावित्रीबाई:**—जीव पोळला असला म्हणजे नेहमीं बाई वाईट डोळ्यापुढें दिसतं ! कांहीं झालं तरी मला सांगायला कोण येणार ? आणि माझ्याकरितां तपास तरी कोण करणार ? आम्ही आतां निराश्रित आहोंत. ( घाबरते ) आतां पांच होऊन गेले असतील नाहीं ?

**चंद्रीची आई:**—येतील हो, पांच झाले म्हणून काय झालं ? ( बाळ अण्णा येतात ) हे बघा आले. कारे इतका उशीर ? तुमची आई बघा रडायला लागली ! आईची कांहीं काळजी आहे का ?

**सावित्रीबाई:**—नका हो बोलू त्यांना ! कधीं उशीर होत नाहीं, कांहीं तरी कारण असेल. [ बाळकडे पाहून ] कायरे बाळ काय झालं ! [ चंद्रीच्या आईकडे पाहून ] माझे बाळ कधीं कोठें थांबावयाचें नाहींत. माझ्याशिवाय त्यांना करमत नाहीं आणि त्यांच्याशिवाय मला करमत नाहीं.

**चंद्रीची आई:**—बरं, तुमचे बाळ अण्णा आलेना तुमच्या जवळ ! मग मी येतें ! यायचं विसरूं नका बरं का ? हल्लीं आहे जिकड

तिकडे लग्न कार्यांची धांदल. तेव्हां, इकडे तिकडे जालं तें मेलं अगदीं खपायचं नाहीं ?

**सावित्रीबाई**:--हो, अगदीं पहिल्यांदा येईन, पण हें बघा आतां अण्णाची मुंज तरी माझ्याशिवाय कोण करणार? ठरलीच तर आपल्यालाही हातभार लावावा लागेल. या महिन्यांत फार तिथा आहेत नाहींका चंद्रीची आई? जिकडे पहावं तिकडे आहेच कांहींना कांहीं! आमच्या घरीं मात्र नाहीं. आज आमच्या साहेबांच्या पुतण्याचीही मुंज करण्याचं घाटत होतं. तेव्हां एक वाटे कीं अण्णाची मुंज लावण्याचं पुण्य पदरीं घ्या म्हणून म्हणावं, पण बाई मोठ्याचं काम मोठं! त्यांत कुठें भरजरी शालीला घोंगडीचं ठिगळ! एवढ्या थाटा माटांत व्हायची मुंज त्यांत कुठं आमचं लिगाड लावून घेतील! त्यांत घरांतलं पहिलं वहिलं कार्य! सगळ्या हौशी पुरविण्याची हीच तर त्यांची वेळ. आणि अशा वेळीं आपण हात पसरावें आणि त्यांनीं नाहीं म्हणावं यांत काय अर्थ?

**चंद्रीची आई**:--जरा थांबा. पुढें कशीतरी उरकून घेऊं. कशाला आपण मोठ्याच्या फंदांत पडावं!

**सावित्रीबाई**:--जरा दिवस थोडे पालटले कीं करून घेऊं. आणि एकदां ठरवलं कीं पुष्कळ मला मदत करतील. पण यंदा कदाचित् ठरली तर तुम्हाला सगळं सगळं काम करावं लागेल! नाहीं म्हणून चालायचं नाहीं? तुम्ही नाहीं म्हटलंत तर माझं कोण करणार? मी कोणचीही सबब ऐकायची नाहीं!

**चंद्रीची आई**:--( हसून ) अहो, अगोदर ठरवा तर खरं? मी यायला तयार आहें. पुढच्या पुढें, आधीं परवाच्या लग्नाला या म्हणजे झालं. बाळ, अण्णा, माझ्याकडे चार दिवस रहायचं बर कां?

हें बघा मला आतां बोलवायला येववणार नाहीं. एक माणूस कुठें कुठें जाईल ? तेव्हां न बोलावतां सगळे जण या. ए चंद्रे, [ हाक मारते ] गेली कुठें ? माझ्या बरोबर आली ना ती ? [ चंद्री येते ] कुठें गेली होती ग ?

---

चंद्री:—मी बाळाच्या पुस्तकांतलीं चित्रं पाहत होतें.

**चंद्रीची आई:**—अग टवळे, चल हीच वेळ आहे का चित्र पहायला ? ( वळून ) बरं येतें, सवड साधून या ( जाते. )

**सावित्रीबाई:**—( बाळकडे पाहून ) कारे बाळ, उशीर का झाला ? मी एकसारखी वाट पहात होतें.

**बाळ:**—अग आई, आपल्या बाबांच्या जागीं जे मामलेदार आले आहेत ना त्यांचीं दोन मुलं आमच्या शाळेंत आहेत. ते कधींचे म्हणत होते आमच्या घरीं चल म्हणून, तेव्हां आज त्यांनीं ओढूनच नेलं.

अण्णा:—आई त्यांच घर कसं छान छान आहे ! अग त्यांच्या मुलाचा काय थाटमाट ! शाळेंत सायकलवर बसून येतो तो ! नवी, नवी सायकल आहे त्याची, आणि आमच्या पायांत घालायला आज जोडा देखील नाहीं ? आई आपल्याला कधीं त्यांच्या सारखं राहतां येईल कांग ? आपण नेहमींच गरीब राहणार ? आई आम्हांला मोटारींत कधीं नाहीं काग बसायला मिळणार ?

**सावित्रीबाई:**—[ स्वगत ] बाळांनो, जरी आज तुम्ही एका स्वयंपाकीणीचीं मुलं आहांत तरी एक काळ असा होता कीं तुम्हाला लोक मामलेदारांचीं मुलं म्हणून ओळखीत असत. बाळांनो, सुखाची आपली पाळी संपली ! आतां त्यांची पाळी आहे ! हे दिवस आपले नाहीं ! मुलांचं अंतःकरण कसं दुधासारखं स्वच्छ असतं ! त्यांना काय जगाची

कल्पना ! एका निराश्रित निराधार अबलेचीं आपण मुलं आहोंत ही कल्पना तरी बाळ अण्णा तुमच्या मनांत आली असेल का ! दुसऱ्याचं पाहिलं, आपल्याला तसं असावं असं मनांत आलं ! सांगणार तरी कोणाजवळ ! [ उघड ] अण्णा तुम्ही मोठे व्हा. आपण घेऊ वर सगळं तुम्हाला ! तुझ्या मुंजींत मी सगळं करणार आहे.

**अण्णाः**—[ आश्चर्यानें ] खरंच कां आई ! कधीं आहे माझी मुंज ! माझ्या मुंजींत बँड लावायचा बरं ! नाहींतर मी नाहीं ऐकणार.

**सावित्रीबाईः**—हो बरं, बँड लावूं, वाजंत्री लावूं, दारू इतकी उडवूं कीं, सगळं सगळं गांव माझ्या अण्णाकडे पहात राहील ! मग तर झालं ना !

**अण्णाः**—[ हांसतो ] खरं बरं आई. नाहींतर हें नुसतं

**सावित्रीबाईः**—[ पोटाशीं घेऊन ] नाहीं नाहीं ! असं कसं ! म्हणून तर पहा म्हणावं कोणीं कीं माझ्या अण्णाची मुंज वाईट झाली ! [ स्वगत ] अगदीं वेडा गोळा आहे !

**अण्णाः**—[ हंसून ] हं असं.

**सावित्रीबाईः**—[ स्वगत ] अगदीं वेडा गोळा आहे ! ह्याला कधीं कळायला लागेल कुणास ठाऊक !

**बाळः**—काय ग आई, येथील सरदार म्हणतात आपले नातेवाईक आहेत ? तेही फार श्रीमंत आहेत ग !

**सावित्रीबाईः**—कोण ! त्या श्रीमंत ताईसाहेब ? हो त्या आपल्यापैकींच आहेत. पण बाळ आपण पडलों गरीब आणि गरीब हे नेहमीं लांबचे नातेवाईक असतात. बाळ, मोठे लोक गरीबांना ओळखत नाहींत. आणि आपण आशाही करूं नये. चांगले सख्खे आजकाल

उपयोगीं पडत नाहींत मग ते तर दुरचेच आहेत! देवानीं जन्मभर आपल्या नशीबीं हालअपेष्टाच लावल्या असतील तर आपण तरी काय करणार! देवानीं जेव्हां सुखाची वाटणी केली तेव्हां आपण शेवटीं बसलों होतों! वाटतां वाटतां देवाजवळचं सर्व संपून गेलें आणि नंतर आपण गेलों. आपल्याला कांहीं मिळालें नाहीं! हे दिवस देवानीं दिले मग आपण नको कां गोड करून घ्यायला! आपलं भोगतृत्व अजून संपलें नाहीं. देव आतां आपल्या घरांत रहात नाहीं. त्यानें आपलें घर सोडलें आतां फक्त तुम्ही आणि मी तुमची आई! त्यांनीं आपल्यावर पुन्हा कृपा केली आणि तुम्ही चांगले हुशार झालां तर अजून रामराज्य घेऊन याल. लहानपणीं यातना भोगल्या आहेत, दारिद्र्यावस्थेचे चटके तुम्हांला बसले आहेत. तुमच्या हातून पुढेंही सत्कृत्यंच होतील! हातीं अधिकार आला तरी गरीब दीनदुबळ्या अनाथ माझ्यासारख्या बायकांना तुमच्या हातून रुढळ हातानें मदत झाल्याशिवाय कधीं राहणार नाहीं.

बाळः—[आनंदानें] अग आई, अग आई, काका आले.

अण्णा:—हो हो, आमचे काका आमचे काका, याहो काका, [जाऊन त्यांना मिठी मारितो]

सावित्रीबाई:—या भाउजी. आज वेळ मिळाला का! किती दिवसांतून आलां हो? घर सोडायला आजचा तिसरा दिवस नाहीं? कांहो भाउजी, इतके दिवस तुह्माला कसं हो राहवलं! कसं वहिनींचं चाललं असेल? का बाळ अण्णा उपाशी असतील! कशी आमची राहण्याची सोय झाली असेल याची कांहीं तरी चौकशी? असें नका करूं भाउजी! तुमच्याशिवाय आह्मांला कोण आहे? मी येईन म्हटलं तर त्या येऊं देतील न देतील म्हणून मी नाहीं आले.

**सखारामपंतः**—मी कालच येणार होतों पण थोडं काम निघालें, बसलों झालं तें करीत.

**बाळः**—काका, माझा शाळेंत पहिला नंबर आहे म्हणून मी आतां नादारीकरितां अर्ज केला आहे.

**सखारामपंतः**—असं कां ? [ स्वगत ] विनायकाच्या मुलांनीं आज नादार होण्याची इच्छा करावी ! हिच्या पायीं मी किती नुकसान करून घेईन कुणास ठाऊक ! ऐकतच नाहीं आपण तरि काय करावं !

**अण्णाः**—धावण्याच्या शर्यतींत माझा पहिला नंबर आला ! हें बघा काका, मला पदक मिळालं. [ ब्यागेंतून काढून दाखवितो ] काका मी असा पळतों कीं सर्वांना मागें टाकतों ! माझे पळतांना पाय दिसत नाहींत !

**सखारामपंतः**—असं कां ? शाबास !

**सावित्रीबाईः**—भाऊजी, आमचें तुम्हाला सर्व कळलें असेलच.

**सखारामपंतः**—[ स्वगत ] असं कां ह्मणणं बरं ! [ उघड ] हं त्याला आतां कसं करायचं, तीं तर तुम्ही पाहिली; कांहीं ऐकत नाहीं ! मला असं वाटतं कीं इथें असा अपमान करून घेण्यापेक्षां आपण माहेरी गेलांत तर काय वाईट होईल ?

**सावित्रीबाईः**—भाऊजी हा काय चार आठ दिवसांचा प्रश्न आहे तर माहेरी जाऊन रहायचं ! जन्म काढायचा आणि तोही पोरा-सोरांसुद्धां ! तेव्हां आज नाहीं उद्यां केव्हां तरी त्यांनाही आपला कंटाळा यायचाच. मुलाबाळांची आबाळ व्हायची, पावलो पावली मानखंडना व्हायची, तेव्हां विचार केला कीं नको कुणापुढें पदर पसरायला. शरीर चालत आहे तोंपर्यंत अण्णा बाळाची मी आहे. शरीर चालेनासं झालं कीं मग परमेश्वरावर हवाला !

सखारामपंत:—तुमचंही बरोबर आहे. पण तुमच्या अशा वागण्यानीं आम्हाला थोडा कमीपणा येतो.

सावित्रीबाई:—आमच्या वागण्यानीं तुम्हाला कमीपणा ? ह्मणजे मी कसं काय वागतें ? नांवे पाडतां येतील असं वर्तन आहे का माझं ? तसं असेल तर सांगा.

सखारामपंत:—तसं नाहीं हो. पण आह्मी असं रहायचं आणि तुह्मी तसं राहायचं ह्मणजे जरा कमीपणा आहे. आह्माला फार त्रास होतो.

सावित्रीबाई:—मी तुह्माला काय त्रास देतें ? कधीं चार दाणेंदेखील मागणार नाहीं हो ? तुह्माला माझ्या जिवंत राहण्यापासून कमीपणा तो का वाटतो मी लोकाच्या घरीं स्वयंपाक करतें ह्मणून ?

सखारामपंत:—त्याचं कांहीं नाहीं ! आह्मी काय लागलों आहोंत लक्षाधीश ! आमचं आमचंच पोट भरतां भरतां आमची नाकीं नव येतात, आणि तुमची आह्मी काय व्यवस्था करणार ! हा महिना संपला कीं पुढच्या महिन्याच्या पहिल्या तारखेची वाट पाहतां पाहतां डोळे पांढरे होतात ! येवढेंच वाटतं कीं, आपण इथं राहिल्यानीं एकंदरींत वाईटच.

सावित्रीबाई:—भाऊजी तुह्मी पार्वतीबाईच्या सांगण्यावरून काय असं भलतंच ह्मणतां ? स्वतः थोडा विचार करा कीं अशा परिस्थितींत मी काय करावें ?

सखारामपंत:—तसं नाहीं हो, आपलं एकंदरींत सांगतों.

सावित्रीबाई:—असं कसं एकंदरींत ? त्याला अर्थ तर पाहिजेना ? गी मी सांगू का ? हें सर्व पढवलेलं आहे ! अगदीं पढवलेलं आहे !

आपल्या सहवासांत मी पुष्कळ दिवस होतें, आपला स्वभाव मला ठाउक आहे.

सखारामपंत:—नाहीं वहिनी मलाच नाहीं तर आम्हां दोघां-नाही असंच वाटतें.

सावित्रीबाई:—भाऊजी ते शब्द तुमचे नाहींत! आपल्या तोंडांतून हे शब्द कधीं निघणार नाहींत! पण विचार करा कीं, पोटालाही द्यायचं नाहीं आणि भीकही मागूं द्यायची नाहीं म्हणजे माणसांनीं वागावें तरी कसें? भाऊजी, अगदीं पाठीवर पाय देऊन आले त्यांच्या मुलाविषयीं काय ही माया! पार्वतीबाईना म्हणावं कीं इतकंही कांहीं पाण्यांत पाहूं नये! भाऊजी तुमच्या भावाचींच मुलं आहेत कांहीं लोकांचीं नाहींत!

सखारामपंत:—वहिनी, मी कांहीं बोललों कां? पण ती म्हणते कीं हें असं बरं नाहीं! आणि तेंही खरंच आहे. मलाही घटको-घटकी लोक विचारतात; कीं असं वेगळं कां भाऊजयेला ठेवलें?

सावित्रीबाई:—मग मी कुठें नाहीं म्हणत होतें. मी आपल्या घरीं रहायला तयार कां नाहीं? आमचा बायकांचा-आधार खुंटला कीं शेवटीं पोळपाट लाटण्याशिवाय त्यांना कोणतां बरं आधार आहे! खरं खरं सांगतें तुमचा कांहीं दोष नाहीं सगळी कळ बाईकडे आहे.

सखारामपंत:—तसं कांहीं नाहीं. मी कांहीं तिच्या बोलण्या-प्रमाणें वागणारा मनुष्य नाहीं. तिनंही सांगितलं अन् मलाही पटलं म्हणून आपल्याला दुसरीकडे सोय पहायला सांगितली.

सावित्रीबाई:—मीठ भाकरी खावी पण अब्रूनें खावी. नशीबांत नव्हतं लिहिलं सुख! मागच्या जन्मीं कांहीं पाप केलं असेल तें पुढें उभं राहिलं! त्याला तुमचा काय इलाज? आपला कांहीं दोष

सखारामपंत: मला कां वाटते आपण दारोदार स्वयंपाक करीत हिंडावें ! पण दिवस कसे आहेत बघांना वहिनी ! सकाळ ... संध्याकाळ कशी जाईल याची काळजी ! तुम्हाला सांगून पाहिलं माहेरी कांहीं सोय पहा पण नाहीं लक्षांत येत.

सावित्रीबाई:—अहो भाऊजी, घरच्या माणसाचं असं वर्तन मग माहेरचे तर दूरच राहिले ! त्यांचा काय संबंध बरें ? लग्न लागलं तेव्हांपासूनच मी या घराण्यांत आलें ना ? आतां माहेरचा काय संबंध उरला ? उगीच लोकांवर कशाला आपलं ओझं टाकावं. नवीन नवीन या, या, म्हणतील. पण पुढं झालं हेंच कुठेंही असलं तरी व्हायचं ! चाललं आहे तेंच ठीक आहे. परमेश्वर ठेवील त्यांतच आनंद मानावा ! पण भाऊजी मधून मधून येत तरी जा ! तितकाच आधार वाटतो. कांहीं नाहीं केलंत पण नुसता शब्दानीं धीर दिला तरी अगदीं समाधान वाटतं. आपल्या मायेचं कोणी तरी आहे, असं वाटलं म्हणजे तितकाच धीर येतो.

अण्णाः—काका आतां तुह्मी जाऊं नका. आमच्याकडेच राहा_

सखारामपंतः—नाहींरे मी आतां जातों कांहीं काळजी करूं नका. मी येत जाईन नेहमीं.

अण्णाः—काका मी येऊं का तुमच्या बरोबर ?

सखारापंतः—नकोरे बाळ ती रागावेल ! बरं मग तुम्ही नाहीं जात माहेरी ?

सावित्रीबाईः—नाहीं हो भाऊजी. कसं जावं ?

सखारामपंतः—तिची फार इच्छा होती ! बरं ! [ जातो ]

# अंक दुसरा.

## प्रवेश चवथा.

[ स्थळः-रस्ता. चंद्रीची आई घाईघाईनं जाते व जातांना तिकडून श्रीमंत ताईसाहेब भेटतात. ]

**चंद्रीची आईः**—बऱ्या बाई भेटल्या तुम्ही रस्त्यांत. तुमच्याच घरीं निघालें होतें. फिरून फिरून पायाचे कसे तुकडे पडले आहेत.

**ताई साहेबः**—आज आहे कसं काय एवढं नथ घालून फिरतां आहांत ?

**चंद्रीची आईः**—अहो, आमच्या यमीचं लग्न ठरलं ! म्हणून आमन्त्रण देत फिरते आहे. तुम्ही या बरं सीमंतीला, अक्षतीला, लग्नाला ? आतां मी नाहीं बाई तुमच्या घरीं येत. राग मानूं नका बरं ? आणि राग मानला तरी काय ? तुम्ही माझ्या लहानपणच्या मैत्रीण आहांत. तुम्ही सरदारीण असल्या म्हणून काय मला कांहीं मोठ्या नाहींत ! [ आठवलंसं करून ] बरं तुमचं दत्तकाचं काय ठरलं ? अजून नाहीं कां मुलगा पसंत पडत ?

**ताई साहेबः**—नाहीं हो ! तुमच्या पाहण्यांत आहे काय कोणाचा मुलगा ?

**चंद्रीची आईः**—[ विचार करते ] माझ्या पाहण्यांत काय ? [ बाळ त्याच रस्त्यानें येतो ] अरे बाळ, इकडे ये तर. हा बघा मुलगा.

हा पसंत आहे ? असेल तर बोला. अगदीं हातचं आहे. तुमचा आणि माझा जसा घरोबा आहेना तसाच माझा आणि ह्याच्या आईचा आहे. शद्ब टाकला कीं अगदीं नाहीं म्हणायची नाहीं.

ताई साहेब:—खरंच बाई मुलगा बरा दिसतो ! याचं वय काय असेल बरं ?

चंद्रीची आई:—असेल अकरा बारा फार तर. मुलगा हुशार आहे बरं का ! रुपानं देखील कांहीं वाईट नाहीं. बोला आहे पसंत ? हें बघा माझ्या मुलीचं जसं लग्न अचानक जमवून आणलं तसं हें देखील ठरवून देतें. परवांच्या तिथीला दत्तविधानही उरकून घ्या.

ताई साहेब:—[ बाळाकडे लक्ष लावून पहातात. ] खरंच बाई मला तर वाटतं कांहीं हरकत नाहीं. पण कुंडली पाहिली पाहिजे. ग्रह चांगले आहेत का नाहीं ? एकदम ठरवून कस बरं चालेल ? या बाबतींत सगळ्यांचा विचार घेतला पाहिजे.

चंद्रीची आई:—[ जातां जातां ] बरं घ्या विचार आणि मला कळवा. मी येतें. ही लग्नाची मोठी काळजी माझ्या पाठीमागें आहेना ! त्यामुळें अगदीं फुरसत नाहीं. बरं येतें.

बाळ:—( हाक मारतो ) चंद्रीची आई, आईनें तुम्हाला निरोप सांगितला आहे कीं, ( हळूंच सांगतो ) अण्णाचा सदरा फार फाटला आहे, घरांत कुणाचा जुनापाना असला तर द्या.

चंद्रीची आई:—बरं. जा बरं तूं घरीं. मी पाठवून देईन.

( सर्व जातात. )

# अंक दुसरा.

## प्रवेश पांचवा.

[ स्थळ:--चंद्रकांत साहेबांच्या बंगल्यांतला एक दिवाणखाना. लीलाबाई बसल्या आहेत व सावित्रीबाई उभ्या आहेत. ]

सावित्रीबाई:—सुखामागून दुःख मोठं वाईट! पहिल्यांदा किती दुःखांत देवानें लोटलं तरी बाई चालेल. पण एकदां सुखाचे दिवस दिले कीं नंतर दुःखाची कल्पना देखील असह्य वाटते.

लीलाबाई:—जन्मभर सुखानं देव कोणालाच नाहीं कांहीं ठेवीत! मला बाई अजूनपर्यंत कांहीं कमी नाहीं माहेरींहि कांहीं कमी नव्हतं आणि सासरींहि कांहीं कमी नाहीं. पुढं तर नाहींना दुःख व्हायचं!

सावित्रीबाई:—मागच्या जन्मीचं पुण्य बाई तुमचं. तुम्हाला नाहीं दुःख देणार देव. ( आठवण झाल्यासारखें करून ) बरं लीलाबाई, आपण किती वेळ बोलत बसलों आहोंत! जास्त वेळ बोलत बसलों तर मला स्वयंपाकाला वेळ होईल! मी लागतें आपल्या कामाला. [ जाऊं लागते. ]

लीलाबाई:—हो बाई वेळ झाला तर त्यांचा स्वभाव आहे जरा रागीट. सांभाळूनच वागलं पाहिजे.

सावित्रीबाई:—[ आठवल्या सारखं करून. पुन्हां परत येते व नम्रतेनें ] बाईसाहेब, मी नोकरी कधीं केली नाहीं म्हणून आपल्याशीं

अदबीनं वागण्याची आठवण न राहून कदाचित् बरोबरीच्या नात्यानें एखादा दुखादा शब्द तोंडांतून निघत असेल त्याची क्षमा करा बरं. मी सरळ अर्थात् एखादा शब्द बोलेन पण त्याचा अर्थ आपण निराळाच घ्याल. आकाश कोसळलं म्हणजे सगळ्या बाजूनें कोसळतं, आपण आहांत म्हणून मी जिवंत आहें.

लीलाबाई:—पण मी कधीं तुम्हाला म्हटलं आहे कां ? तुम्ही परकेपणा अगदीं धरूं नका.

सावित्रीबाई:—मी लागतें आतां स्वयंपाकाला. [ जाते ]

लीलाबाई:—[ आठवून ] बरी आठवण झाली. सावित्रीबाई जरा इकडे या बघूं. ( येते ) आतां चातुर्मास सुरूं होणार ना ? तेव्हां मी त्यांना विचारलं कीं काय व्रत धरूं. चातुर्मासाचं ! ते म्हणाले, तुला वाटेल तें कर. तेव्हां असं ठरवलं आहे मनाशीं कीं, चार महिने पुरेल इतकं धान्य ब्राह्मणाला द्यावं; मागाहून पुन्हां असं वाटलं कीं, तुम्हालाच दिलेलं बरं ! कांहीं हरकत नाहीं ना ? [ सावित्रीबाई डोळ्याला पदर लावते ] अहो डोळ्याला पदर कां लावला ? [ स्वगत ] बाईंना कां बरं वाईट वाटलं असेल ? मी बोललें तरी काय ? असं! [ उघड ] आपण असं घेत नाहीं कां ?

सावित्री बाई:—घेतें बरं.

लीला बाई:—मग रडूं कां आलं ? रागबीग तर नाहीं आला ना बोलण्याचा?

सावित्रीबाई:— बाई साहेब, स्वयंपाकीण बाईला रागबीग कसचा बरं यायचा ? आमचे आज रागावण्याचे दिवस कां आहेत ? निमुटपणानें सहन करून घ्यायचे दिवस आलेत आतां! आणि जन्मभर

हे असेच रहायचे! आपल्या बोलण्याचा राग नाहीं बरं आला! बाई, आपण एवढं प्रेमानं मला विचारतां हेंच भाग्य माझं!

लीलाबाई:—मग वाईट कसचं वाटलं?

सावित्रीबाई:—मागें चातुर्मासांत मी देखील चार महिने धान्य दिलं. ज्या हातांनीं दिलं त्याच हातांनीं आज घेण्याची पाळी आली म्हणून वाईट वाटतं, दुसरं काय? चातुर्मासांत किती धांदल! सगळं सगळं डोळ्यापुढें उभं रहातं. आम्हाला आतां जन्मांत नाहीं कांहो चातुर्मास करायला मिळायचे? आमचे चातुर्मासाचे दिवस संपले! आतां आमच्या वनवासाला सुरवात झाली!

लीलाबाई:— सगळे दिवस सारखे असतात काय? असं हात पाय गाळून कसं बरं चालेल? मी आपल्या बहिणी सारखीच आहे.

सावित्रीबाई:—हें काय भलतंच बोलतां? मी स्वयंपाकीण आहे. मोलमजुरी करणारी ब्राह्मणाची बाई आहे.

लीला बाई:—कांहीं वाईट वाटूं देऊं नका. आतां बघा मुलं मोठीं झालीं कीं तुमचे दिवस पालटतील. जेवढं भोक्तृत्व असेल तेवढं भोगलं पाहिजे. आतां अगदीं रडूं नका. पुसा डोळे. अगदीं पुसा. आणि हें बघा, घ्यायला कांहीं हरकत नाहीं. वेळ आली तशी साजरी केली पाहिजे. घ्यायला कांहीं हरकत नाहीं. तितकीच मदत होईल.

सावित्रीबाई:—[ स्वगत ] मी गृहस्थाच्या घरची आहे? मी भिक्षुकीण कां आहे? हें देवाधर्माचं घ्यावं काय? देवधर्म केल्यानें लोकांची हडापीडा टळून माझ्यावर येणार नाहींना! दहा रुपयांत माझ्या अण्णा बाळाचे कपडे, फी, पुस्तकं, घराचं भाडं कसं भागेल? माझे अण्णा, बाळ दुपारीं शाळेंतून मधल्या सुट्टींत आले कीं त्यांच्या

हातांवर ठेवायला कांहीं नसतं! घेतलं तर पुष्कळ मदत होईल. बरं, नाहीं घेतलं तर मला बाईसाहेब माजोरी ह्मणतील. [ थांबते ] बाळ अण्णा, सर्व इडापिडा माझ्या अंगावर घेऊन तुमच्याकरितां घेतें.

लीलाबाईः—विचार काय करतां ?

सावित्रीबाईः—कांहीं नाहीं. घेतें ह्मटलं. आठवण करीन तुम्हाला.

लीलाबाईः—चला डोळे पुसा अगदीं. जा आतां कामाला लागा, नाहींतर ऑफिसला उशीर होईल. त्यांचा स्वभाव ठाऊकच आहे तुम्हाला !

सावित्रीबाईः—[ स्वगत ] दुःखाचं सांत्वन दुःख केल्यानें होतं, पण तेवढं देखील कुठं आहे माझ्या नशिबांत ! मनमुराद रड-ण्याची देखील मोकळीक नाहींना परमेश्वरा मला दिली ? देवा असं काय जीवित हें ! [ आठवून ] पण विचार करायला ही वेळ नाहीं. तिकडे चूल खोळंबली असेल.

[ चंद्रकांतसाहेब अपटुडेट पोशाखानं सिगार ओढीत प्रवेश करितात ]

चंद्रकान्तः—[ रागावून ] काय ए ! त्या स्वयंपाकिणीला इथं दिवाणखान्यांत कशाला येऊं देतेस ? तिच्याशीं काय गुलगुल गोष्टी सांगत बसतेस ? तुला आपला दर्जा काय आहे हें समजत कां नाहीं ?

लीलाबाईः—कां बरं? सावित्रीबाईचा दर्जा कशानं कमी झाला ? आज स्वयंपाक करण्याची पाळी आली म्हणून त्या माझ्यापेक्षां हीन काय ? आणि मी त्यांच्याशीं बोलायचं देखील नाहीं हा कुठला न्याय ?

चंद्रकान्तः—[ रागावून ] चूप बोलूं नको जास्त ! पोझिशन कशाला म्हणतात हेंच मुळीं हिला समजत नाहीं. तूं तर ब्रदरहुडचं तत्व

अमलांत आणायला लागलीस ! पण अशामुळं पोझिशने जाते याचा कांहीं विचार ? ए बाई, [ सावित्रीबाई येते ] स्वयंपाक घराच्या बाहेर येत जाऊं नको. मागल्या दरवाजानें नेहमीं वापरीत जा. जरा आपल्या पायरीनं रहात जा. लघळपणा जास्त करीत जाऊं नको. दिवाणखान्यांत यायला तुला कोणी सांगितलं होतं ? ध्यानांत ठेव. येथें आमचे नेहमीं दागदागिने पडलेले असतात. जर कांहीं अफरातफर झाली तर मी गय करणार नाहीं. बाई माणूस म्हणून मी मागें पुढं पाहणार नाहीं. मी सरळ पोलिसच्या ताब्यांत देईन. ध्यानांत ठव. मला माहीत आहे तुम्ही बायका चोर असतां. ( थांबते ) जा स्वयंपाकाला लाग. हे पहा कामाला जरा लवकर येत जा. आपण आतां स्वयंपाकीण आहांत. मामलेदारीण नाहींत. याची आठवण राहू द्या. जा. दहाचे साडेदहा झाले तर पगार देणार नाहीं महिन्याचा. [ सावित्रीबाई एकीकडे पहात असते व सर्व ऐकत असते. जाते. ]

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

[ स्थळः— सावित्रीबाईचें राहण्याचें घर. चंद्रीची आई घाई घाईनें प्रवेश करिते. ]

चंद्रीची आईः—अहो सावित्रीबाई, अहो सावित्रीबाई, घरांत आहांत कां नाहीं ?

सावित्रीबाईः—आलें आलें. [ बाहेर येते, तिच्या बरोबर बाळ अण्णाही येतात. ] काय बाई ? इतक्या घाई घाईनं कुठें इकडे आल्या ? कांहीं जरूरीचं काम आहे कीं काय ?

चंद्रीचीआईः—हो फार जरूरीचं आहे ! अगदीं आनंदाची गोष्ट आहे !

सावित्रीबाईः—बरं झालं तुह्मी लवकर आल्या. मी आतां साहेबांच्या घरीं जाण्याच्या तयारींतच होतें. काय आहे काम ?

चंद्रीची आईः—बरं बाई जास्त बोलूं नका. सरदारांच्या घरची मंडळी बाहेर उभी आहेत; त्यांना बसण्याकरितां कांहीं टाका. बाळ, अण्णा काय पाहतो ? चला कांहीं सत्रंजी, काय जें असेल तें टाका. बाहेर उभे आहेत ते ! [ हंसत हंसत ] हें बघा बाळासाहेब आह्माला ओळखा बरं कां पुढें ?

सावित्रीबाईः—सरदार ! अन् माझ्या घरीं ! कशाला बाई

आलें आहेत ? तसं आहे आमचं नातं लांबचं, पण माझ्या घरीं येण्याचें आज काय बरं कारण ?

**चंद्रीची आई:**—सगळं सगळं कळेल. एवढंच सांगतें कीं अगदीं आनंदाची गोष्ट आहे. [ बाळ अण्णा एक सत्रंजी टाकतात दोन तक्के ठेवितात. ] हें बघा मी ताई साहेबांना सांगितलं कीं मला वेळ नाहीं; उद्याचं लग्न, माझ्या शिवाय घरांत कोण पाहणार आहे ? पण श्रीमंत ताईसाहेब घरीं आल्या, आणि उभ्याउभी आलंच पाहिजे तुमच्याशिवाय व्हावयाचं नाहीं असं म्हणून घेऊनच आल्या. त्यांचा शद्ब कसा मोडावा ? म्हणून आलें झालं. बरं बोलावूं त्यांना आंत ? [ बाहेर जातें व सरदारांच्या घरची दोन तीन मंडळी सरदारी पोषाखांत आंत घेऊन येते ] बसा असें, [ बसल्यावर ] बाईची गरीबी आहे, आपल्या इतमामाप्रमाणें पाहुणचार होणार नाहीं. त्याचं मनाला वाटूं देऊं नका ? हा बाळ बरं का [ बाळाकडे पोट दाखविते ] हा मुलगा मी ताईसाहेबांना दाखविला आहे. मुलगा फार हुशार आहे.

**एक गृहस्थ:**—बाळासाहेब, या असे, बसा. [ बाळ मध्यें बसतो. त्याजकडे सर्वजण निरखून पाहतात. चिरंजीव छान आहेत ? खरोखरीच चिन्हं चांगलीं दिसतात ! या शास्त्रीबुवा पहा बरं यांचा हात !

**शास्त्रीबुवा:**—[ पाहतो ] वा ! लक्षण फार छान आहेत ! आजपर्यंत पाहिलेल्या मुलांत हेच आपल्याला पसंत आहेत.

**सावित्रीबाई:**—[ हळूंच चंद्रीच्या आईशीं एकीकडे ] हें चाललं आहे काय ? त्याचा हात काय पाहतात ? शास्त्री काय आणले आहेत ? [ बाळही टकमक आईकडे पाहात असतो ].

**एक गृहस्थ:**—[ सावित्रीबाईकडे पाहून ] सावित्रीबाई, आम्हांला तुम्ही ओळखलं नसेल. साहजीक आहे. आम्ही सरदाराच्या

घरची मंडळी आहोंत. आम्ही चांगल्या मुलाच्या शोधांत एक वर्ष झालें फिरत आहोंत. आम्ही पसंत केला, तर ताई साहेबांनीं त्याला नकार द्यावा. असं आजपर्यंत होत आलं आहे. शेवटीं ताईसाहेबांनींच मुलगा पसंत केला असं ऐकलं. तेव्हां मुलगा पहावयास आम्ही आलों आहोंत. श्रीमंत ताईसाहेबांचा आग्रह फार आहे; या शिवाय त्यांना दुसरा पसंत नाहीं व हाच मुलगा घ्यावयाचा त्यांचं निश्चित ठरलं आहे. तेव्हां आपल्याकडे मागणी घालण्याकरितां आलों आहोंत.

**सावित्रीबाईः**—रावसाहेब, आपण माझ्या गरीबाच्या घरीं आला काय आणि श्रीमंत ताईसाहेबांनीं मुलगा पसंत केला काय मला सर्वच नवल वाटतं! केव्हांची काय चाललं हें कळण्याचा प्रयत्न करितें पण कांहीं समजत नाहीं. आम्हा गरीबाच्या घरीं सरदार लोकांनीं येऊन मागणी करावी असं आमचं कुठं भाग्य आहे? आतां आम्ही गरीब झालों; दारोदार मागत फिरण्याचं काम आमचं आहे. दुसऱ्या जवळ मागण्याची आम्हांला संवय झाली आहे. आपण सरदार लोक आणि माझ्या गरीबाच्या घरीं काय मागतां हेंच मला कळत नाहीं!

**एक गृहस्थः**—आपले चिरंजीव बाळा साहेब! [ सावित्रीबाई आश्चर्यानें त्यांच्याकडे पाहते ]

**चंद्रीची आईः**—( हंसत ) अहो असं काय करितां? श्रीमंत ताई साहेबांनीं आपला बाळ दत्तक घ्यावा असं ठरवलं आहे! ऐकतां काय? देवाला तुमची दया आली आणि एकदम हुकूम पाठविला कीं तुमच्या बाळाला सरदाराच्या गादीवर बसवा! आहे कां नाहीं बाळाची आणि बाळाच्या आईची पूर्व पुण्याई! म्हणत होतें कीं, आनंदाची गोष्ट मी सांगणार आहें तें. खरं झालं ना! विचार काय करतां? अशी गोष्ट ऐकून आनंद व्हायचा तो टाकून विचार काय करीत आहांत? अहो सावित्रीबाई, किती जण हातापाया पडत आहेत श्रीमंत ताई-

साहेबांच्या कीं आमचा मुलगा दत्तक घ्या ! खरोखरी बाळाचा राजयोग कीं, हत्तीवर अंबारींत बसण्याचं भाग्य लाभलं ! हें बघा सावित्रीबाई आम्हाला ओळखा बरं कां ! ( हंसते )

एक गृहस्थः—विचार काय करतां ? दत्तक द्यायला काय हरकत आहे ? वंश चालवायला दुसरा मुलगा असल्यावर उगाच विचारांत काय पडलां ? श्रीमंत ताईसाहेबांनीं अगदीं निश्चित ठरवलं कीं घ्यावयाचे तर तुमचे जेष्ठ चिरंजीवच घ्यावयाचे. नाहींतर दत्तकच घ्यायचा नाहीं.

चंद्रीचीआईः—नाहीं म्हणूं नका. हें बघा देवानें तुमची हाक ऐकली. आतां कशाला पाहिजे बाळ अण्णा मोठे व्हायला ? बघाना लहानपणींच तुमचे दिवस पालटून टाकले ! मी म्हणतें सगळं तुमचं देवानें गाऱ्हाणं ऐकलं बरं. आतां कांहीं वाईट वाटायला नको.

सावित्रीबाईः—थोडा विचार करावा लागेल. ( एकीकडे चंद्रीच्या आई जवळ ) मला स्वयंपाकाला जायला उशीर होतो. तिकडे साहेब बोलतील.

चंद्रीची आईः—नाहीं म्हणूं नका. कांहीं विचार करायला नको. माझं तुम्ही या वेळीं अगदीं ऐका. ( आश्चर्यानें ) मला तुमचं मोठं आश्चर्य वाटतं बाई ! असं वेड्यासारखं काय करतां ! पालखी पदस्थ मुलगा होतो आहे. आज खरं म्हणाल तर राजाचं वैभव आहे ! म्हणेल तें करील येवढी सत्ता सातजन्म घेतले तरी नाहीं मिळणार ! हत्ती, घोडे, काय वाटेल तें मिळेल. आपल्याला मोटार कधीं मिळेल म्हणून म्हणत होताना बाळ ? बघा तेवढंच देवानें ऐकलं. एकच मोटार काय प्रत्येकांकरितां मोटार म्हटलं तरी घेईल ! सावित्रीबाई, उचलतां येणार नाहीं इतके दागीने करून ठेवले आहेत ! बाळानें घातलेलें

एकदां डोळे भरून बघा ! देवानें पुढ्यांत ठेवलेलं ताट नका ढकलून देऊं ?

**दुसरा गृहस्थः**—सावित्रीबाई, आज किती मुलं लोटांगण घालीत येत आहेत. पण श्रीमंत ताईसाहेबांना तुमचेच चिरंजीव पसंत पडले. घेईन तर यांनाच घेईन नाहींतर दत्तक घेणारच नाहीं असं त्या म्हणाल्या. ताईसाहेबांच्या म्हणण्याप्रमाणें झालंच पाहिजे बघा.

**चंद्रीची आईः**—त्यांना काय विचारतां ? मी सांगतें. उद्यां ठरलं बरं का दत्तविधान. अगदीं ठरलं. तुम्ही पुढच्या उद्योगाला लागा.

**दुसरा गृहस्थः**—बरं आहे. मोठा आनंद झाला ! आमच्या हातून या बाळासाहेबांची सेवा होणार ! गादीला शोभेल असंच केव्हांही बाळासाहेबांचं वर्तन होईल. बरं आहे बाळासाहेब, [ बाळाला नमस्कार करतात. ]

**सावित्रीबाईः**—बाळ दुसऱ्याच्या घरीं द्यायचा ! [ थांबते ] कल्पना थोडी चमत्कारिक वाटते, काय करावं कांहीं सुचत नाहीं चंद्रीची आई ?

**चंद्रीची आईः**—मी सांगतें ना ठरलं म्हणून मग काय ? अहो मुलाचं काय नुकसान करितां ? जन्माचं कल्याण आहे.

**दुसरा गृहस्थ**—बरं येतों. सर्व तयारी आमची झालीच आहे. उद्यांचाच मुहूर्त मुक्रर ठरवितों. कसं काय शास्त्री ?

**शास्त्रीः**—उद्यांचा मुहूर्त अगदीं उत्तम आहे. उगीच उशीर करण्यांत अर्थ तरी काय ?

**दुसरा गृहस्थः**—बाळासाहेब सेवा गरीबाकडून करवून घ्यावी.

**चंद्रीची आईः**—अण्णा पाहतोस काय ? आतां तुझ्या मुंजींत बँड लावूं बरं ? अगदीं थाटांत मुंज होईल बरं का ! नको कोणापुढें हात पसरायला ! ( थांबते ) पार्वतीबाईंना म्हणावं कीं पहा तुम्ही लोकांचं वाईट करतां ना, देव त्यांचं चांगलंच करतो !

**एक गृहस्थः**—गांवांत प्लेगची धांदल असल्यामुळें आपल्या मळयांतच मंडप घालूं. त्याला कांहीं वेळ लागणार नाहीं. अगदीं सर्व तयार आहे. बरं येतों. आतां अगदीं लवकर व्यवस्था पाहिली पाहिजे.

**सावित्रीबाईः**—आमच्या घरीं आलां तसं कांहीं तरी घ्यायचं असतं ? थोडें थांबा ?

**एक गृहस्थः**—नाहीं अगदीं नको. हे घेतल्या सारखंच आहे. बरं येतो. नमस्कार बाळासाहेब. ( जातात )

**चंद्रीची आईः**—सावित्रीबाई गरिबाला ओळखा बरं कां ! अडी अडचणीला उपयोगी पडा ! नाहींतर राजे साहेबांच्या आई तुम्ही ! ( आठवून ) हो, पण मग कसच्या तुम्ही बाळासाहेबांच्या आई ! मी विसरलेंच ! दुसरी आई करणं म्हणजे तर दत्तविधान, खरी आई आणि खोटी आई असेंच म्हटलं पाहिजे नाहीं हो ! बरं कांहीं का असेना. आम्हां गरीबांला तुम्ही ओळखलं म्हणजे झालं. बरं फार वेळ झाला. येतें आतां. ( जाते व पुन्हां येते ) दत्ताविधानाला मला नाहीं येतां यायचं. तुमचं आटोपल्यावर या बरं उभ्या उभी ? ( जाते )

**सावित्रीबाईः**—( स्वगत ) बाळाला दत्तक द्यायचं म्हणजे कायमचं द्यायचं का ? अग बाई. पण माझा बाळ दत्तक जाण्याच्या आधींच मला अंबारींत बसलेला डोळ्या समोर दिसतो ! पण मी त्यांत आनंद मानूं कां दुःख मानूं ! गरीब झाले म्हणून आईनं श्रीमंताला मुलगा विकावा कां ? मी विकणारी आई होणार आणि ती विकत घेणारी आई होणार !

बाळः—अग आई, ए आई.

सावित्रीबाईः--[ स्वगत ] बाळ आज मला आई म्हणून हाक मारितो उद्यां काय बरं हाक मारील ?

बाळः--आई, अग साहेबांच्या घरीं केव्हां जाणार ? बोलावणं येईल ना ?

सावित्रीबाईः—हो बरी आठवण झाली ! अगबाई उशीर झालाच ! मी जातें बरं ( जाऊ लागते )

अण्णाः—कायग आई, हे कोण होते ग ? कशाकरितां आले होते ?

सावित्रीबाईः—आल्यावर सांगेन अं.

[ सर्व जातात ]

---

# अंक तिसरा.

## प्रवेश दुसरा.

( स्थळः-- सावित्रीबाईच्या घरासमोरील आंगण. पार्वतीबाई हळूच इकडे तिकडे पहात प्रवेश करितात. )

पार्वतीबाईः--( स्वगत ) ही चांगली आणि मी वाईट काय ? पहातें कोण चांगली आहे तें ! मेलीनं सर्व गांव माझ्याविरुद्ध करून टाकला ? पाताळयंत्री तरी किती आहे ! बघाना काय संधान

बांधलं सरदाराशीं ! म्हणतात बाळ दत्तक देणार त्यांच्या घरीं काय ! मेलीचं नशीब बघाना ? पण म्हणावं मी मुलं जिवंत राहूं देईन तेव्हां ना ? म्हणे मला कोणाचं चांगलं बघवत नाहीं. नाहींच बघवत मला चांगलं ! एवी तेवी मी वाईट झालीच आहें, मग मी आतां कांहीं झालं तरी हिचं वाईट केल्याशिवाय कां राहणार आहे ? मी एखा-द्याच्या मागें लागली म्हणजे त्याचा पुरता सत्यानाश करितें, नाहीं कमी करीत ! बायका तरी चाहटळ कशा आहेत बघा ना ? तिच्याशीं गुलगुल गोष्टी करितात, आणि माझ्या घरीं कोणी ढुंकून देखील पाहत नाहींत ! मी वाईट झालेंच आहे. तर आतां चांगलीच वाईट होऊं द्या ना ! जन्मभर रडायला लावीन तर नांवाची खरी ! [ हळूच इकडे तिकडे पाहून ओचांतून दोन केळीं काढून दरवाजासमोर पायरीवर ठेविते ] बाळ अण्णांनीं नुसतं बघितलं तरी पुरे ! सावित्री ! मी नाहीं तुला सुखांत राहूं द्यायची ! सर्व गांव तिचे गुण गाणार आणि मला शिव्या देणार ! द्या म्हणावं शिव्या . मी आतां हट्टास पेटली आहे. नाहीं मेलींत तर हातानें मारून टाकीन . कमी नाहीं करणार ! ही अंबारींत बसणार आणि मी मजा पाहूं का ? [ जाते ]

[ बाळ दार उघडतो व केळीं पाहतो ]

**बाळः**—वारे वा काय मजा आहे ! कोणाचीं राहिलीं बरं हीं ! आज माझे ग्रह फार चांगले दिसतात ! [ घेतो व खाऊं लागतो, अण्णा प्रवेश करितो ]

**आण्णाः**—वारे वा ! एकटा एकटा खातोस काय ! मला दे. [ दुसरें केळें हिसकावून घेतो ] कोणीं दिलं तुला ? चंद्रीची आई आली होती काय ?

**बाळः**—नाहीं . इथेंच कोणी विसरून गेलं.

**अण्णा:**—असं दररोज कोणी विसरेल तर काय मजा होईल! काय छान आहे! [ आठवून ] पण चल. आई तुला हाक मारिते. दासबोध त्या दिवसापासून वाचावयाचा राहिला आहे ना? चंद्रीच्या आईकडून दुसरा दासबोध आणला आहे आईनं.

**बाळ:**—बरेच दिवसांत वाचला नाहीं. पण कायरे " परंतु तेथें भगवंताचें अधिष्ठान पाहिजे " येथपर्यंत झाला होता नाहीं त्या दिवशीं? चला आतां पुढचं ऐकूं. [ जातात ]

---

# अंक तिसरा.

## प्रवेश तिसरा.

[ **स्थळ:**—शोभिवंत केलेला एक मंडप. त्यांत दत्तविधानाच्या तयारींत सरदारी थाटांत पोषाख केलेली बरीच मंडळी इकडून तिकडे फिरत आहेत. श्रीमंत ताईसाहेब उच्च आसनावर उंची वस्त्र व दागदागीने घालून बसल्या आहेत. समोरच्च ताटांत बाळाकरितां दागदागिने ठेवले आहेत; सर्व बाळाची वाट पहात आहेत. ]

**शास्त्री:**—अजून बाळासाहेब आले नाहींत? आतां वेळ होत आली! चला, जा घाई करा. मुहूर्त निघून गेल्यावर काय उपयोग?

**एक गृहस्थ:**—[ चपरासीकडे पाहून ] जा बरं पुन्हां एकदां पाहून ये कुठपर्यंत तयारी झाली? एवढा उशीर कां लागला? पालखा पाठविली आहे, त्यांत लवकर घेऊन ये. [ चपरासी जातो ]

ताईसाहेबः—बाळासाहेब तुमच्याशीं कांहीं बोलले कायरे ? म्हटलं त्यांचा आवाज कसा गोड आहे, नाहीं ? गाणं येतं कां नाहीं कुणास ठाऊक बाळासाहेबांना ! रूप तरी काय आहे ? पहात रहावंसं वाटतं !

एक गृहस्थः—ताईसाहेब, सर्व उत्तम आहे. इतके दिवस थांबलों त्याचं चीज झालं. गरिबींत वाढले असल्यामुळें मोठे चाणाक्ष आहेत ! फार हुशार आहेत !

ताईसाहेबः—(दागिन्याच्या ताटाकडे बोट दाखवून) या मधला ...मला वाटतं लहानतर होणार नाहीं ? मी सांगत होतें कीं एकदां घालून बघा पण नाहीं ऐकलं. बरोबर झाला नाहीं म्हणजे ऐनवेळीं नाहीं का फजिती ? तो नसला म्हणजे नाहीं कां वाईट दिसणार ?

पहिला गृहस्थः—झाला नाहीं तर दुसरा मागवून घेऊं. आहे काय त्यांत ? पण तसं कशाला ? तुमची आज्ञा असेल तर दोन तीन तूर्त मागावून घेऊं; जो नीट होईल तोच घालूं मग तर झालं ?

ताईसाहेबः—तसंच करा, आणि असं करा त्यावर बाळासाहेबांचं नांव काढून आणा. चांगलं दिसेल ना तसं ?

पहिला गृहस्थः—हो चांगलं न दिसायला काय झालं ? पण नांव काय काढायचं ?

ताईसाहेबः—हो नांव काय बरं ठेवायचं, बाळासाहेबांचं ?

शास्त्रीः—हें बघा विठ्ठल नांव ठेवा. त्या विठ्ठलाच्या कृपेनें असा योग जुळून आला तेव्हां विठ्ठल हेंच नांव ठेवा.

ताईसाहेबः—इश्श कांहीं तरी. हें बघा शालिनी कुमार ठेवा. बरं दिसतं कां ?

पहिला गृहस्थः—त्यांत वाईट काय आहे ! छान आहे !

[ चपरासी येतो ]

चपरासीः—ताईसाहेब, पालखी आली. [ पालखी आणून चपरासी ठेवतात, बाळ अत्युत्तम पोशाख करून बाहेर येतो. सगळे त्याला मुजरा करितात. त्यांतील एक गृहस्थ त्याचा हात धरून ताईसाहेबांच्या शेजारच्या आसनावर बसवितो. चपरासी चौरीनें वारा घालतात. शास्त्री तयारीला लागतात. त्या नंतर हळूच नेहमींच्याच पोशाखांत सावित्रीबाई व अण्णा प्रवेश करितात. सावित्रीबाई बराच वेळ बाळाकडे पहात असते. ]

अण्णाः—आई त्यांना देऊन टाकायचा काय ग बाळ ? मला बाळ नेहमीं म्हणत होता कीं तुला भिकारिणीपासून भाकरीच्या तुकड्यावर घेतला. खरंच घेतला होता काय ग ?

सावित्रीबाईः—नाहींरे अण्णा, तें सर्व खोटं आहे.

अण्णाः—मग बाळ लोकाला खरोखरच द्यायचा काय ग ? कां हें खोटं ? भाकरीच्या तुकड्यावर द्यायचा काय ग?

सावित्रीबाईः—अण्णा तूं म्हणतो आहेस तरी काय ?

शास्त्रीः—[ घाई घाईनें ] मुलाची खरी आई अजून आली नाहीं ? हाक मारा, हाक मारा. [ सावित्रीबाईकडे पाहतो ] या सावित्रीबाई चला. घाई करा. दोन मिनिटंच राहिलीं ! आपल्या चिरंजीवांना मी सांगेन तेव्हां श्रीमंत ताईसाहेबांच्या मांडीवर बसवा बरं का ? [ कांहीं मंत्र म्हणतो व मधून मधून सावित्रीबाईना कांहीं शब्द म्हणायला सांगतो ] सगळीडे सावध रहा. बँडवाले, वाजंत्रीवाले सावध रहा, म्हणावं वेळ जवळ आली, [ कांहीं मंत्र म्हणतो ]

हें बघा बाळासाहेब आजपासून आपली आई या श्रीमंत ताईसाहेब बरं. [ हंसतो ]

बाळासाहेबः—( स्वगत ) काय ? माझी आई आज दुसरी होणार ? ( थांबतो ) हा सर्व विधि दुसरी आई करण्याचा आहे तर मग ! आई, ( हाकमारतो ) मग आजपासून तूं माझी आई नाहीं कां ? ( सावित्रीबाई बाळाकडे पाहते व सर्व ऐकते ) मी माझ्या आईला आजपासून आई म्हणूं नको ? ( थांबतो ) आई, आई, पैशाकरितां ही आई माझी नाहीं, हा अण्णा आजपासून भाऊ नाहीं, असं बिनदिक्कत या तोंडानें कसं म्हणूं ? मग मी ह्यांना म्हणूं तरी काय ? हे माझे आजपासून कोणी नाहींत ? संपत्तीकरितां मी यांचा संबंध तोडायला तयार आहें असं देवादिकांसमोर कसं म्हणूं ? ( थांबतो व निश्चयानें ) नाहीं. अस कधीं व्हायचं नाहीं. अशानं मी पापी ठरेन ! मला स्वर्गात यातना भोगाव्या लागतील ! ( उघड )...... ......—शास्त्रीबोवा—मला तुम्ही हें काय शिकवितां ? ज्या आईनं दारोदार भीक मागून तुकडा तुकडा मिळवून मला घातला त्या आईला संपत्तीकरितां दूर लोटूं ? शास्त्रीबुवा, मला तुम्ही गुन्हा करायला सांगत आहांत. मी असं करीन तर स्वर्गात गुन्हेगार ठरेन. मी कृतघ्न ठरेन. मला देहान्त प्रायश्चित देतील. ( आईकडे पाहून ) आई, आई, पैशाकरितां नको ग मला विकूं ? आई विकतचं प्रेम किती दिवस पुरणार ! हा प्रेमाचा झरा, केव्हां आटेल याचा नेम नसतो. आईसाहेब या संपत्तीकरितां, या........करितां, या दागदागिन्यांकरितां मी हिला आई म्हणूं ? तुझ्यावर प्रेम न करतां हिच्यावर प्रेम करूं ? आई मला दोन दिवस खायला नसलं तर चालेल. मी हट्ट करणार नाहीं. पण मला लोकाला देऊन टाकूं नको ग ! तूं साहेबांच्या घरीं स्वयंपाकाला गेली म्हणजे तुझ्यामागें मला तेवढीच हुरहुर लागत होती. तूं घरीं आलीस कीं आनंद वाटत होता. आई मला कायमचं दूर

लोटल्यावर मला जिवंत तरी कसं राहवेल ? आई ! आई ! आई ! ( आठवून ) हो आई या शद्वात किती पावित्र्य आहे ! किती प्रेम आहे ! किती स्वार्थत्याग भरला आहे ! तो कधीं पैशानें विकत मिळेल काय ? मला ही भाडोत्री आई नको. या पालखीचं सुख मला आई, तुझ्याशिवाय लाभणार नाहीं ! आई, मला दुःखांत लोटूं नको ! आई, इतके दिवस सांभाळ केला मग आतांच मी तुला जड झालों काय ?

पहिला गृहस्थः—बाळासाहेब हें सर्व आपलेंच आहे. मग तुम्हाला दुःख कसचं ?

बाळः—( आठवून ) होय हें सर्व माझें आहे, हे दागदागिने माझे आहेत, हा......माझा आहे, हा हत्ती माझा आहे, ही अंबारी माझी आहे, हे चाकर नोकर सर्व माझे आहेत. मग मला नाहीं काय ? मला जगांत सगळं आहे. फक्त माझी आई असं जिला ह्मणेन अशी मला आई नाहीं ! मग मी हें सर्व पत्करूं काय ? नाहीं, मी पतकरणार नाहीं. माझ्याकरितां जिनें हाल अपेष्टांत दिवस काढलेत त्यांचा मोबदला मी अशा रीतीनें फेडणार नाहीं. हा अधमपणा आहे. पण आई तूं तरी मला कां दूर लोटतेस ? आई ! तुझ्याजवळ आनंदांत मीठ भाकरी खाईन पण नको मला तुझ्या व माझ्या भावी आशेवर दूर लोटूं नकोस. आई, साहेबाच्या घरचा अर्धामुर्धा उष्टामाष्टा लाडू पदरांत बांधून मला आणि माझ्या अण्णाला प्रेमानें देतांना व तो खातांना जें पवित्र सुख मला मिळत होतं त्याची सर यांच्या घरच्या पांची पक्वान्नांना तरी येईल काय ?

सावित्रीबाईः—बाळ, तूं ह्मणतोस इतकी मी निर्दय नाहींरे ! बाळ तुझ्याच भावी मनोराज्यांत मी आतांपर्यंत निमग्न होतें. तुझ्याच सुखाचा विचार मी करीत होतें.

बाळः—मला यांत आई सुख वाटत नाहीं.

सावित्रीबाईः—मग बाळ मी तुला दूर सोडीत नाहीं, तुमच्या सुखांत मला सुख आहे. बाळ माझ्या स्वार्थाकरितां मी आजपर्यंत केलं नाहीं, आणि पुढेंही करणार नाहीं. शास्त्रीबुवा, मी माझा बाळ दत्तक देत नाहीं. [ बाळाला एकीकडे नेऊन पुढें घेऊन उभी राहते. ]

पहिलागृहस्थः—( रागानें ) देत नाहीं म्हणजे काय ? एकदां कबूल करून ऐनवेळीं विश्वासघात करितां ? ध्यानांत ठेवा, मी कोर्टांत खेचेन, विश्वासघाताची फिर्याद करीन तुमच्यावर ! वारे वा ! घरीं खाण्याची भ्रांत पडली आहे आणि दिमाख काय करितां ? माया माया अशी बरी माया ! आम्ही निर्दय आहोंत काय ? कां तुम्हाला माया आहे आणि आम्हांला नाहीं ? आम्ही दत्तक घेतों मुलगा तो काय त्याचं बरं वाईट करायला घेतों ! समजत नाहीं उमजत नाहीं आणि उगाच ऐन वेळीं असं करायचं म्हणजे काय ?

ताईसाहेबः—( शांतपणानें ) सावित्रीबाई, आपणही माझ्या घरींच रहा, आपण का लोक आहांत काय ? तुम्हीही त्याचं कौतुक करा.

सावित्रीबाईः—आपल्या घरीं रहायचं म्हणजे जाणून बुजून परक्याच्या घरींच तुकडे मोडायचे ना ? हक्कानें मला राहतां येईल काय ? ताईसाहेब, बाळाचं कौतुक करूं म्हणतां पण लोकांच्या मुलाचं मी कसं कौतुक करूं ? त्याचं मी कसं भूषण मानूं ? बाळ जे वेळेस अंबारींत बसेल, सरदारांच्या गादीवर बसेल, तेव्हां तो माझा मुलगा म्हणून बसणार नाहीं, श्रीमंत ताईसाहेबांचा मुलगा म्हणून बसेल. मग माझा आणि त्याचा काय संबंध ? आणि मी त्यांत आनंद काय मानूं.

पहिला गृहस्थः—बाईसाहेब, जरा विचार करा. आपण अन्नाला महाग अहांत ! आम्ही जें करतों तें तुमच्याही बऱ्या करितांच आहे ! ही मोल मजूरी करून कां उगाच हाल करून घेतां ?

**दुसरा गृहस्थः**—सावित्रीबाई ( एक पिशवी पुढें करतो ) दोन हजार ! ( सावित्रीबाई, नाहीं म्हणून मान हालविते ) अहो, नाहीं म्हणूं नका. एवढा मानेलपणा काय करितां ? घरांत स्वखुषीनें येणाऱ्या लक्ष्मीला लाथ मारूं नका ? याचा परिणाम चांगला होणार नाहीं. द्या. मुलगा द्या. बघा, पश्चात्ताप पावाल !

**पहिला गृहस्थः**—सावित्रीबाई याला माया नाहीं म्हणत ! ही वेडी माया आहे. जन्माचं कल्याण होत आहे ! त्याला आडवं पडायचं म्हणजे काय ? जरा पोक्त विचार करा.

**सावित्रीबाईः**—[ रागावून ] नाहीं. नाहीं. नाहीं. साफ नाहीं ! आज दोन भांडीं लोकांचीं घासतें आहें, माझ्या बाळाला त्रास व्हायला लागला तर आणखी चार लोकांचीं भांडीं घासीन पण माझा बाळ दत्तक देणार नाहीं.

**शास्त्रीः**—ताईसाहेब, काय उपयोग ? गेला. मुहूर्त निघून गेला ! सावित्रीबाई, हें काय केलंत तुम्ही ? "विनाशकाले विपरीत बुद्धि !" [ पडदा पडतो ]

# अंक चवथा.

## प्रवेश पहिला.

[ स्थळः—रस्ता, चंद्रकान्तसाहेब व लीलाबाई रस्त्यानें जात आहेत. दुसरे बाजूनें सावित्रीबाई घाई घाईनें येतात. ]

**लीलाबाई**—सावित्रीबाई, अहो सावित्रीबाई, एवढी धांवपळ कसंची? जरा थांबा?

**सावित्रीबाई**—[ रडते ] नाहीं हो बाई, माझ्या अण्णाबाळाला कालपासून एकाएकी कसा फणफणाट ताप भरला. अगदीं हात लावूं देईना. रात्रभर डोळ्याला डोळा नाहीं. इकडे बाळ आणि तिकडे अण्णा, दोघांनीं अगदीं घाबरून दिलं. दोघेही अगदीं निश्चेष्ट पडले आहेत. तेवढ्यांत मी डॉक्टरकडे जायला निघालें. दोघं चौघं जे जे भेटले त्यांना माझ्या बाळांना पहायला म्हणून सांगून आलें. तुम्ही देखील या, माझ्या बाळांना बघून जा एकदां? काय आहे अन् काय नाहीं! सत्रा कल्पना मनांत येतात. दुसरं तिसरं तर नसेल ना?

**लीलाबाई**—उगीच कांहीं तरी कल्पना करून कां घेतां? असा ताप तर येतोच आहे. हवाच मुळीं वाईट आहे.

**सावित्रीबाई**:—मला नाहीं बाई कांहीं कळत. अगदीं भांबावल्यासारखं झालं आहे मला. जें हातांत येईल तें उगाळून लावितें आहे. आमच्या घरगुती काथ्यामेथ्यांनीं काय होणार? डॉक्टरला सांगून आलं पाहिजे. आहे माझी साधारण डॉक्टरची ओळख. पाहतें जाऊन.

तुह्मी या बरं ? मी एकटी काय करूं आणि कुठें कुठें जाऊं ? तुम्ही लवकर या. काय आहे आणि काय नाहीं हें कळल्याखेरीज माझा जीव खालीं होणार नाहीं.

लीलाबाई:—असा धीर सोडून कसं बरं चालेल ? तुम्हींच धीर सोडला तर मुलांनीं काय करायचं ? तुम्हाला धीराचे चार शद्व तरी सांगायला कोणी आहे काय ?

सावित्रीबाई:—[ रडते ] या बरं ? तुमच्या पाया पडतें बाई ! पण कसंही करून या. मला त्यांच्याशिवाय कोण आहे ? [ डोळ्याला पदर लावते व रडते ]

लीलाबाई:—अगदीं काळजी करूं नका. हें बघा देवाची कृपा असल्यावर सर्व कांहीं ठीक होईल.

सावित्रीबाई:—नाहीं हो बाई ! परमेश्वर माझ्यावर कोपला आहे ! आतां माझ्या घरांत त्याचं अधिष्ठान नाहीं. बाई, पांखरासारखीं एकसारखी फडफड करते आहे. ज्योतिषाला विचारून आलें, म्हटलं देवाधर्माचं असेल तर कबूल करीन सगळं. ते म्हणाले आजचा दिवस कठीण आहे, आजचा दिवस गेला म्हणजे भीति नाहीं. बाई, माझे ग्रह फिरले हो ! या बरं बाई कसंही करून, म्हणजे थोडा धीर येईल. मी एकटी आहें. माझ्यावर असा प्रसंग कधीं नाहीं. मी जातें. मला वेळ नाहीं. अण्णाबाळाला पाहून जा; माझ्या खेरीज सबंध आळीमध्यें कोणी चिटपाखरूं नाहीं. आपण कसंही करून या बरं बाई ? कसं होईल हो माझं ? बरं मी जातें. त्यांच्या जवळ कोणी नाहीं. [ जाते ]

चंद्रकान्तः—काय खेडवळ लोक ? आह्मी येऊन तरी काय करणार ? मी कां डॉक्टर आहे ? गांवांत असा प्लेगाचा धुमधडाका.

कशावरून प्लेग नसेल ? प्लेग हा स्पर्शजन्य रोग आहे. आह्मी येऊन मरायचं कीं काय ? कांहीं जाऊं नकोग.

लीलाबाई:—[ रागानें ] जाऊं नको ? आणि तिच्याजवळ कोणी नसतांना ! अहो ती आपल्या वेळीं अवेळीं उपयोगीं पडते, मग मला नको कां जायला ? तिचीं मुलं ह्मणजे तिचा प्राण आहे बरं ! किती धीराची बायको, पण आज रडायला लागली ! मला गेलंच पाहिजे. येऊन जाऊन काय ती मेली मरणाची भीतीना ? मग मरण मला यायचं असलं तर तिथेंच गेलं पाहिजे असं थोडंच आहे; न जातां इथें बसल्या बसल्या देखील मरून जाईन आणि मी मेल्यावर आपण कां लग्न केल्याशिवाय राहणार आहांत ? मी आपली जाणार. देव तरी काय दीन दुबळ्यांचाच काळ ! बाईला कधीं सुख नाहीं बरं ! किति किति काबाडकष्ट करते ! रात्रींदेखील दळण दळते हो मुलांकरितां ! पोटच्या गोळ्याची माया अगदीं वेडी असते.

चंद्रकान्त:—तुह्मी गेल्यामुळें मुलगा मरायचा असेल तर राहणार आहे कां ? काय बायकांची वेडी समजूत आहे ? कांहीं जायचं नाहीं. स्वयंपाकिणीच्या घरीं जायचं ह्मणे ! अग तिचा दर्जा कोणचा आपला दर्जा कोणचा याचा कांहीं विचार ! कांहीं जायचं नाहीं ! चल हो पुढें !

लीलाबाई:—अहो असं काय ? थोडं तरी माणसासारखं वागावं ? गरीब झाले ह्मणून काय त्यांना जीव नाहीं ? त्यांच्या जिवाची आपण कांहींच परवा करूं नये काय ? आपण श्रीमंत आहोंत तर त्यांच्या जिवावर श्रीमंत आहोंत ना ? तें कांहीं कां असेना मी आपली जाणार.

चंद्रकान्तः—अग असं काय वेड्यासारखं करते? प्लेगचे दिवस, न जाणो करायला गेलें कांहीं आणि झालं कांहीं तर माझं कसं होईल?

लीलबाईः—ठाऊक आहे, ठाऊक आहे. हे जे शब्द निघत आहेत तोंडांतून ते माझ्या प्रेमामुळें नाहींत तर तो आपला स्वार्थ आहे. माझ्या पश्चात् महिना दोन महिने आपल्याला त्रास आणि पुन्हां दुसऱ्या लग्नाचा खर्च ह्मणून हें स्वार्थी प्रेम आहे. तुह्मीच काय, सगळं सगळं जग मेलं असं निर्दय बनलं आहे. एवढं सुशिक्षित सुशिक्षित ह्मणवायचं आणि दुसऱ्याचा जीव जाणायचा नाहीं! मागें पुढें मीच प्लेगानें आजारी पडलें तर तुह्मी जवळ बसणार नाहीं जवळ! मग औषध पाणी तर दूरच राहिलं!

चंद्रकान्तः—पुरे! मी तुला जाऊं देणार नाहीं. चल घरीं! येतेस कीं नाहीं? [ ओढून नेतो. ]

---

# अंक चवथा.

## प्रवेश दुसरा.

[ **स्थळः**—सावित्रीबाईचें राहण्याचें घर, सावित्रीबाई मध्यभागीं बसल्या आहेत. त्यांनीं बाळाचं डोकं एका मांडीवर ठेवलं आहे व दुसरे बाजूला अण्णा निजला आहे, जवळच सहान, पाण्यानें भरलेला तांब्या, भांडें आहे. ]

सावित्रीबाईः—बाळ, बाळ, अरे बाळ, [ हालविते ] नाहीं. अजून गुंगींतच आहे; डॉक्टर साहेब, याहो माझ्या बाळाला पहा हो! कसे गोजिरवाणे आहेत! मी देईन! आतां मजजवळ पैसे नसले तरी पुढच्या महिन्याला मला मिळाले कीं मी सगळा पगार तुमच्या स्वाधीन करीन. मी माझ कांहींही करीन; पण द्या जीवदान माझ्या बाळांना! मी त्यांना एकटं टाकून आणखी कोणाला कसं बोलवायला जाऊं? या दिवसांत कसं कोणी येणार आजाऱ्याजवळ? आमचे साहेब झोपडीवर रहायला गेलेत. आम्हांला गरिबाला कशाची झोपडी बांधण्याची ऐपत! देवा, तूंच आहेस आतां. [ बाळ अण्णा आई आई करितात.] नको नको, बाळ रडूं नको. मी आई तुझ्याजवळ उभी आहे बरं हात जोडून! आतां कोणाजवळ हातापाया पडूं म्हटलं तर तेही शक्य नाहीं.

बाळः—आई दुखतं आहे ग!

सावित्रीबाईः—कुठें रे बाळ?

बाळः—कंबरेंत दुखतं आहे. फार आग होते आहे, केव्हां बरं होईल ग?

सावित्रीबाईः—बाळ जवळच्या बाईनीं ओढा लावायला सांगितला आहे, तो उगाळून लावतें बरं.

बाळः—नको आई. तूं नको मांडी काढून घेऊं. कुठें जाऊं नको. आम्हाला आतां बरं वाटेल. तूं अगदीं जवळ बसून रहा. अण्णाचं कसं काय आहे! तो बरा आहेना?

सावित्रीबाईः—हो बरं बाळ. चांगला आहे बरं. तूंही चांगला हो लवकर.

बाळः—हो ग आई, माझी परीक्षा जवळ आली आहे फार ! कसं होईल ?

सावित्रीबाईः—बाळ त्याची अगदीं काळजी करूं नकोस. मी जाईन. मला काय झालं न जायला मास्तराकडे ! जाईन. अगदीं हेडमास्तराकडे जाईन आणि सांगेन कीं बाळ माझा आजारी होता म्हणून कमी मार्क मिळाले. आतां लवकर बरं व्हा अं ? [ मुका घेते अंगावरून हात फिरविते ]

अण्णाः—आई दुखतं ! औषध लाव ! अगोदर लाव !

सावित्रीबाईः—थांब थोडा. असं कसं बरं चालेल ? अण्णा आपल्याला कोण उगाळून देईल औषध ? आपण गरीब माणसं, आपल्या घरीं कुठून येणार डॉक्टर ? तुम्हांला झोंप लागली तेव्हां मी जाऊन आलें डॉक्टरकडे. तो म्हणाला, मला फार काम आहे. वेळ मिळाला तर येऊन जाईन. मी त्याचीच वाट पहातें आहें. [ स्वगत ] कदाचित् मला घालवून देण्याकरितां डॉक्टरांनीं तोंडापुरतं तर सांगितलं नसेल ना ? आम्हां गरीबांजवळून काय मिळणार त्यांना ! आतां तर त्यांची दिवाळी आहे. मी मोठ्या काकुळतीनें सांगितलं त्यांना ? त्यांच्याही मनाला कींव आली असेल. कांहीं झालं तरी मनुष्यच आहेत ! मला वाटतं उभ्याउभी येऊन जातील. असं कसं मेलं जग आहे ! पैसा पैसा काय ? जीवापुढें पैसा जास्त आहे काय ? त्यांनाही पोरबाळ आहेत कां नाहीं ? ( औषध उगाळायला उठते. सहान घेऊन उगाळीत बसते बाळ अण्णा तिच्या अंगावर हात टाकून निजतात. )

सावित्रीबाईः—बाळ आतां लवकर बरं व्हायचं अं ? आपण बरं झाल्यावर नेहमींप्रमाणें देवाच्या दर्शनाला जाऊं अं ?

अण्णा:--आई मला कीं नाहीं त्या दिवशीं तें तूं साहेबांकडून आणलं होत ना तें फळ दे ना ग ?

सावित्रीबाईः--कोणचं रे बाळ ? भूक लागली कां तुला ? कोणचं फळ ह्मणतोस तूं ?

अण्णाः--तें गोड लागतं तें ! तूं साहेबाकडून पदरांत बांधून आणलं होतं ?

सावित्रीबाईः--सफचंद ?

अण्णाः--हो तेंच तें ! मला दे ना आई ? मला तें फार आवडलं. मला कीं नाहीं सबंध पाहिजे.

सावित्रीबाईः--[ स्वगत ] अण्णा, तुझ्या मनांत आलं, तुला खावसं वाटलं, तेव्हां तुला कसचा मागचा पुढचा विचार. मागून गेलास ! [ डोळ्यांतून अश्रू येतात. ]

अण्णा:--आई देतेना मला पाहिजे तें ?

सावित्रीबाईः--अण्णा, तें कीं नाहीं साहेबाच्या घरीं पार्सल आलं होतं मुंबईहून त्यांतून एक मला दिलं. दिलं कसचं, मी स्वयं-पाकीण माझ्या पदरांत घातलं.

अण्णाः--मग आतां नाहीं मिळणार कां ?

सावित्रीबाई:--हो, हो, आणतें बरं. हें औषध लावून देतें आणि नंतर आणतें बरं.

बाळः--दे नग आई ? तो काय मागतो तें ?

सावित्रीबाईः--[ स्वगत ] परमेश्वरा ! आसन्नमरण झालेल्या माझ्या लाडक्यांची इच्छा मरतांना देखील मला पुरवतां येऊं

नये ! देवा ! कायरे मागच्या जन्मीं पाप केलं म्हणून आम्हांला गरीब केलंस ! सफचंदाची एक फोड देखील तोंडांत घालायला मजजवळ नाहीं !

अण्णाः—आई, आणते ना ?

सावित्रीबाईः—हो बरं बाळ, हा ओढा लावतें आणि मग घेऊन येतें. [ डोक्यावर ओढा घालते ] [ स्वगत ] देवा! माझ्या निराश्रित विधवेच्या पाठीमागें हात धुवून कारे लागलास ? देवा ! तूं देखील गरीबाचा काळ झालास कारे ? आम्हांला तुझ्याशिवाय कोणाचा बरं आधार !

बाळ:—डॉक्टर नाहीं आले काग अजून ? अण्णाचं कसं काय आहे ? आई, फार आग होते ग ?

अण्णा:—आई, आई, आई ! जवळ ये. असं कसं होत ग ? तूं जवळ ये.

सावित्रीबाईः—कसं होतं ? मी जवळ आहे बरं !

अण्णाः—[ घाबरून उठून बसतो व हात पुढें करून दाखवितो ] हे आले ! हे पहा ! आई ! काळे कांबळ पांघरलेले काठ्या घेऊन मला न्यायला उभे आहेत ! त्यांना मार ! त्यांना हाकलून दे !

सावित्रीबाईः—कोण ? जारे मेल्यांनो ! माझ्या बाळावर कां बरं तुम्ही टपला आहांत ? गेले बरं बाळ ! दूर गेले. आतां तुझ्याजवळ फक्त मी आहें.

अण्णाः—नाहीं आई, ते पहा जवळ आले. मार ग त्यांना !

सावित्रीबाईः—[ स्वगत ] त्यांना मारायची अण्णा माझ्यांत शक्ति नाहीं रे ! मी त्यांना विनंती करीन कीं, या चौघजण कोण

आहांत तें आणि मला पहिल्यांदा घेऊन जा. मला नाहीं पहावत. [ चपापून ] आले का डॉक्टर ? पाय वाजल्यासारखे वाटलं ? [ उसासा टाकून ] नाहीं ! कोणी नाहीं ! देव तरी काय अंत पाहतो आहे माझा ! त्या वेळेस वाटलं परमेश्वर यापेक्षां माझं काय वाईट करणार. पण आमच्या वरची त्याची दृष्टि अजून नाहीं फिरली. देवीला दहीभात वहायचा तो मी विसरलें नाहीं. मागच्याच मंगळवारीं बाळ अण्णांना बरोबर घेऊन त्यांच्या हातून तुला वाहिला. मग कां बरें हें असं ? बाई काय मागावयाचं तें माग ! पण मी पडलें गरीब, तरी पण देवानो, जे कोणी माझ्यावर रागावले असतील त्या सगळयांना हात जोडून सांगतें कीं, बाळअण्णाखेरीज जें मागायचं असेल तें मागा. मी द्यायला तयार आहें.

अण्णाः—आई ?

सावित्रीबाईः—हो, बरी आठवण दिली देवा ! माझ्याकडून माझ्या लाडक्या अण्णाला एक सफरचंदाची फोड देववत नाहीं मग मी तुला काय देणार ? आणि तेंहि बाई खरंच आहे. मी माझ्या बाळअण्णावर मोठें. त्यांना दिवस बरे आले म्हणजे सगळं देईन बरं.

अण्णाः—[ घाबरून उठतो ] पुन्हां दिसायला लागले ग ! आई, तूं जवळ ये ! मला तूं पाहिजे. दुसरं कोणी नको !

सावित्रीबाईः—[ स्वगत ] मला तूं पाहिजे ! ( थांबते ) कोण म्हणत आहे बरं हें ? समजायचं तरी कसं ? कोणी देव म्हणतो आहे का माझा अण्णाच म्हणतो आहे हें ? कोणी का म्हणत असेना ! मी आपलं सांगतें कीं मला मागत आहेस तर मी माझ्या स्वतःचा बळी द्यावयाला तयार आहे. घेऊन जा. मला आतां घेऊन जा ! माझी कांहीं हरकत नाहीं. पण एकदां जातां जातांना माझ्या अण्णाबाळांना हंसतांना पाहूं द्या ! माझ्यापुढें खेळतांना पाहूं द्या !

अण्णाः—असं काय आई ! काय करतेस तूं !

सावित्रीबाईः—कांहीं नाहीं बरं. खरंच बाई मी काय बडबड करितें आहे !

अण्णाः—आई ! आई ! माझी आई !! माझी आई ! ! ! ( आळेपिळे देऊन आईच्या मांडीवर मरतो )

सावित्रीबाईः—अरे देवा, अरे देवा, असं काय करतोस ! अरे मला यांच्याशिवाय कोणी नाहीं रे ! [ थोडा वेळ स्तब्ध राहते व रडते ]

बाळः—आई, हे आई ! माझी आई !

सावित्रीबाई—[ स्वगत ] बाळ, तुझीच आई रे आतां ! आतां मी अण्णाची आई नाहीं. अण्णानें दुसरी आई केली. त्याला माझ्यासारखी गरीब आई, जी आई सफरचंदाची फोडदेखील देऊं शकत नाहीं ती पसंत नाहीं ! जा, अण्णा ! कुठेंही जा ! कोणच्याही जन्मांत जा. पण इथल्यापेक्षां सुखांत रहा ह्मणजे झालं !

बाळः—अण्णा झोंपीं गेला काय ग आई !

सावित्रीबाईः—तो निजला बरं बाळ ! [ बाळाला मांडीवर घेते ]

बाळः—आई मलाही अशा वेदना होत आहेत कीं मलाही वाटतं कीं मी झोंपीं जाईन तर बरं होईल. एवढा त्रास होणार नाहीं. सगळं आंग ठसठस करतं आहे !

सावित्रीबाईः—नको रे बाळ असं काय ह्मणतोस ! देवा, मला कशीरे नाहीं झोंप आणीत ! मी काय पाप केलं आहे ?

बाळः—डॉक्टर आले नाहीं कां अजून !

सावित्रीबाईः—नाहीं. येतील बरं थोड्या वेळानें !

**बाळः**—आई अण्णा बोलत कां नाहीं? त्याला औषध दिलं कां?

**सावित्रीबाईः**—दिलं बरं औषध! [ स्वगत ] या हातानें ओढा घालीन, औषध पाजेन, डोकं दुखत असलं तर थापटून देईन, या हातानें सगळं सगळं करीन! पण बाळ, तुझ्या शरीरांतलीं यंत्रं हा हात कशीं चालवूं शकेल रे! माझा जन्म देण्याचा फक्त अधिकार आहे! पुढें माझ्या हातांत त्या देवानें कांहीं ठेवलं नाही.

**बाळः**—आई! आई! आई!! माझी आई!! माझी आई!! ( आळेपिळे देऊन मरतो. )

**सावित्रीबाईः**—देवा, धांव रे धांव! नको. फोडून टाक माझे डोळे. बाळ बाळ, तळहातावरच्या फोडाप्रमाणें जप जप जपलें आणि निर्दय काळानं अचूक घाला घातला! मेल्या! तुला कांहीं नातं कळतं कां? तूं नवऱ्याची बायको ओळखीत नाहींस, ना आईचीं लहान लहान मुलं ओळखीत नाहींस. तुला बोलून तरी काय होणार? माझं नशीब फिरलं! इथं माझ्याकडे पाहणार नाहीं, पण देवा, तूं देखील दीनदुबळ्याचा नाहीं ना? उन्हातान्हांतून वन वन भटकून माझ्या चिमण्यांच्या तोंडांत एक एक दाणा घालून लहानाचं मोठं केलं! देवा, का रे इतका निर्दय होऊन माझ्या बाळांवर झडप मारून घेऊन गेलास! [ थांबते. बाळअण्णाकडे पाहते ] आतां मी बाळ अण्णाची आई नाहीं. मला आतां बाळ अण्णाची आई ह्मणून कोणी ओळखणार नाहीं. मी आजपासून कायमची स्वयंपाकीण बनलें. बाळ, अण्णा, कोणच्या आशेवर मी जिवंत राहूं रे? आतां लोकांचीं बोलणीं मी कोणच्या आशेवर सहन करूं? बाळ, अण्णा, आतां मला कोणी नाहीं!

**शिपाईः**—[ आंत येतो व दरडावून विचारतो ] स्वयंपाकीण बाई आहे कां घरांत? उद्यां सकाळीं स्वयंपाकाला लवकर बोलावलं आहे. साहेबांना उद्यां फिरस्तीला जायचं आहे.

सावित्रीबाई:—स्वयंपाकीण बाई ? ( विचार करते ) हो मी आतां स्वयंपाकीणच झालें ! मला बाळअण्णाची आई म्हणून आतां कोण हाक मारणार ? आतां मी कायमची स्वयंपाकीण बनलें ! ( निश्चयानें ) नाहीं मी आतां स्वयंपाक करणार नाहीं. बाळ, अण्णा, तुमच्या मागोमाग येणार. मला कशी वाट दिसत नाहीं रे ? माझ्या बाळअण्णाची पुण्याई मोठी ! आईच्या मांडीवर प्राण सोडला ! माझी स्थिति काय होणार ? जा. मी येत नाहीं म्हणून सांगा. ज्यांच्याकरितां हाडांचीं काडं केलीं ते बाळअण्णा मला आज सोडून गेले! मी त्यांच्या मागोमाग जाणार. [ शिपाई जातो ]

चंद्री:—( हातांत ताट वाढून घेऊन येते ) अहो बाळाची आई, अहो बाळाची आई, अहो हें काय ? सगळं लग्न संपलं, तरी पण तुम्ही आल्या नाहींत. वा ! आई काय तुमच्यावर रागावली आहे ? आणि आमच्या सुंद्रीला कसा नवरा मिळाला गोरा गोरापान ! तुमच्या बाळासारखाच गोरा गोरापान आहे ! तुम्ही चला आतां घरीं बाळअण्णाकरितां आईनं वाढून दिलं आहे. अहो येतांना मेल्या घारींनीं काय त्रास दिला. शेवटीं दोन लाडू नेलेच [ पाहून ] काय ! अण्णाबाळ निजले आहेत कीं काय ? दुपारीं कां बरं ?

सावित्रीबाई:—पोरी, लाडू मिळाले म्हणून सांग आईला. माझ्या अण्णा बाळाला लाडू मिळाले. ज्या घारीनं माझ्या अण्णा-बाळाकरितां लाडू वर आकाशांत नेले, ती माझ्या अण्णा बाळावर झाप मारून त्यांना माझ्या जवळून घेऊन गेली ! जा बाई, जा तूं. ते निजले आहेत ! बाई, आतां सकाळ, दुपार, संध्याकाळ यांची सगळ्यांची एकच काळझोंप माझ्या अण्णाबाळांनं केली ! अण्णा बाळाला आज पासून कायमची रात्र झाली, जाऊन सांग, म्हणावं दोन गोड घास माझ्या अण्णा बाळाच्या तोंडांत जावे अशी पुण्याई माझी नाहीं !

चंद्री—[ घाबरून ] त्या रडायला लागल्या ! मी जातें बाई !
[ जाते ]

पहिला गृहस्थः—[ एकदम प्रवेश करून ] श्रीमंत ताईसाहेब बाहेर उभ्या आहेत. मोठ्या आशेनें आल्या आहेत. बाईसाहेब दत्तकाबद्दल अजून तरी ठरवा ? ही नाहीं पुढची तिथि ठरवूं. तुमच्या हट्टामुळें श्रीमंत ताईसाहेबांना फार दुःख होईल हो ! तुमच्याजवळ पुत्ररत्न आहे म्हणून संपत्ति आपल्या पायाशीं येते आहे. दूर लोटूं नका ! आमच्या ताईसाहेबांना एकदां पुत्रदर्शन होऊं द्या. ताईसाहेबांना मोह आवरत नाहीं. पुन्हां विचारून ये म्हणून मला पाठविलं आणि त्याही बरोबर आल्या आहेत. सावित्रीबाई, पाया पडतों. [तसें करितो] बघा, हो म्हणा. तुम्ही नाहीं म्हटलं तर आमच्या श्रीमंत ताईसाहेबांना पुत्रशोक होईल पहा ! उठवा बाळासाहेबांना ? असे अस्ताव्यस्त कां निजले आहेत !

सावित्रीबाईः—देवा, दुःखावर कां डागण्या देतोस ! मला आतां नको जिवंत ठेवूं ? बाबा, माझीं मुलं मी कोणाला दत्तक दिलीं नाहींत ! शेवटीं देवानें माझीं मुलं मी नाहीं नाहीं म्हणत असतां दत्तक घेतलीं, तुम्ही जा ! ( तो जातो ) ( बाळअण्णाकडे पाहून ) जा ! बाळांनो, जा ! तुमची आतां तो परमेश्वर मुंज लावील ! अण्णा, देव माझ्यापेक्षां श्रीमंत आहे तो बँड लावील जा ! मी आपली येईन बरं आणि डोळे भरून पाहीन ! बाळ, मी देखील येतें बरं. चला आपण सगळे जण जाऊं ! ! !